# ‘एसआयआर’ला १७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ


दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे | अंक –३२८ | गुरूवार दि.०६ ऑगस्ट २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-328 | Thursday, Dt.06 August 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4


# ५५ कोटींचे ॲनालॉग पनीर नष्ट, परवानेही रद्द!

मुंबई : प्रतिनिधी

राज्यात शाळेबाहेर सकस आहाराचे आदेश दिले आहेत, त्याचे पालन सुरू आहे. फूड सेफ्टी आयुक्तांना लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने काही काळासाठी किंवा वेळेसाठी बंदी घालण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार महाराष्ट्रात ॲनालॉग पनीरवर बंदी घालण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिले. ॲनालॉग पनीर म्हणून नॉन डेरी पनीर विकल जाते. त्याचे विपरीत परिणाम लक्षात घेऊन राज्यात ३० जुलै रोजी नोटीफिकेशन काढून उत्पादन प्रक्रिया, साठवणूक वाहतूक आणि विक्रीवर बंदी घालण्यात आली असून, ५५ कोटींचे ॲनालॉग पनीर नष्ट केल्याचे मुंढे यांनी सांगितले.

महाराष्ट्रात ॲनालॉग पनीरवर एका वर्षासाठी बंदी आहे, पुढे लागली तर ही बंदी वाढविली जाईल, असेही मुंढेंनी स्पष्ट केले. विभागाकडे अनेक तक्रारी होत्या, त्यावर चर्चादेखील सविस्तर झाली. विधिमंडळ सभागृहातही चर्चा झाली. त्यानंतर मार्केटमधून पनीरचे ३०८ नमुने घेतले होते. त्यामध्ये ८९ सबस्टँडर, ३८ असुरक्षित आढळले. ३२ टक्के नमुन्यांमध्ये सुरक्षितता नसल्याचे समोर आले, अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली.

पनीर हा दुधाचा पदार्थ आहे. पण ॲनालॉग पनीरमध्ये नॉन दुग्धजन्य पदार्थ आढळले. अशा स्थितीत लोकांची दिशाभूल होते म्हणून असे आदेश दिले आहेत. छुप्या पद्धतीने हे ॲनालॉग विकले जाऊ नये, म्हणून हा निर्णय घेण्यात आला. याबाबतचे सगळे आदेश उत्पादक प्रक्रिया करणारे, वाहतूकदार, वितरक, विक्रेते यांच्यावर बंधनकारक आहेत. त्यामुळे हॉटेलही ॲनालॉग वापरू शकत नाहीत. या ॲनालॉग पनीरमध्ये प्रोटीनपेक्षा वनस्पती चरबी आढळली आहे, स्निग्धांश जास्त आहेत, म्हणून हे आदेश



काढण्यात आले आहेत. अनॉलॉग पनीरसाठी कोणतेही स्टँडर्ड नाही, अशी माहिती मुंढे यांनी पत्रकार परिषदेतून दिली.

दंडात्मक कारवाई होणार

आम्ही ३०८ ठिकाणांवरून पनीरचे नमुने घेतले होते, त्यातील ३५ टक्के नमुने घातक होते. आता आगामी काळात विशेष मोहीम राबवणार आहोत, जिथे गोदामे आहेत, तिथे तपासणी होणार आहे. आता आगामी काळात आस्थापनांनी दुधाच्याच पनीरचा वापर करावा, कुणी बनावट पनीर विकताना आढळल्यास दंडात्मक कारवाई करणार आहोत.

आरोग्याशी तडजोड नाही : तुकाराम मुंढे

ॲनालॉग आणि पनीरबाबत विशेष तपासणी मोहीम राबवणार असून संशयित उत्पादनांचे नमुने घेऊन पुढील कारवाई होईल. याबाबत सगळ्या अधिका–यांना कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. ग्राहकांना ओरिजनल पनीर मिळावे, यासाठी प्रयत्न असून, नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड होणार नाही, असा इशारा मुंढेंनी दिला.

### ५५.७२ कोटींचा माल नष्ट

राज्यात २५ मेपासून ३१ जुलैपर्यंत राज्यात ३१३७ आस्थापनाची तपासणी केली असून ७६४ आस्थापनांना सुधारणा नोटीस बजावण्यात आली. तसेच १६५ आस्थापनांचा परवाना निलंबित करण्यात आला. आतापर्यंत २८,६६,०९६ किलो ग्रॅम माल नष्ट करण्यात आला. त्याची किंमत ५५.७२ कोटी रुपये आहे. तसेच राज्यात ८९० हॉटेलची तपासणी केली असून ३२९ हॉटेल्सला सुधारणा नोटीस बजावल्या तर ११६ हॉटेलचे परवाने निलंबित केले.

# बालस्नेही महाराष्ट्र घडविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे - ॲड. संजय विष्णू पुराणिक

## एचआयव्ही बाधित बालकांच्या विशेष बालगृहाला आयोगाची भेट, १८ प्रकरणांवर सुनावणी

बीड (जिमाका)

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष ड. संजय विष्णू पुराणिक तसेच आयोगाच्या सदस्यांनी बुधवारी बीड येथील एचआयव्ही बाधित बालकांच्या विशेष बालगृहाला भेट देऊन तेथील सुविधा व व्यवस्थेची पाहणी केली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात दिवसभर बाल हक्क संरक्षणाशी संबंधित प्रलंबित प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली. एकूण १८ प्रकरणांवर सुनावणी झाली असून त्यापैकी १० प्रकरणे निकाली काढण्यात आली, तर उर्वरित प्रकरणांबाबत आवश्यक




निर्देश देण्यात आले. सुनावणीनंतर आयोगाने जिल्ह्यातील विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी आयोगाच्या सचिव (अतिरिक्त कार्यभार) वंदना पु. जैन, सदस्य गीतांजली बाळाजी बुटी, शुभांगी संजय तांबट, संजय निळकंठराव लहाकेपाटील, अतुल आनंदराव देसाई, प्रवीण संजाबराव भुजाडे, मिलन देवेंद्र जंगम, कनिष्ठ काळजी वाहक अजय लोंढे, परिविक्षा अधिकारी उज्वला होवाल, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शेख फारुख तसेच विविध विभागांचे

पान २ वर...

## गेवराईत १४ ऑगस्टला तिरंगा रॅलीचे आयोजन

# प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज फडकवा – बदामराव पंडित

**रॅलीच्या संयोजकपदी यशराज पंडित**

गेवराई ।प्रतिनिधी

१५ ऑगस्ट या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टीच्या वतीने गेवराईत दिनांक १४ ऑगस्ट रोजी भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. याचवेळी हर घर तिरंगा हे अभियानही राबविण्यात येत असल्याने प्रत्येक नागरिकाने



आपल्या घरावर भारतीय तिरंगा ध्वज फडकवावा असे आवाहन भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने १५ ऑगस्ट या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून दिनांक १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान तिरंगा रॅली अभियान आयोजित करण्यात आले आहे. याच

पान २ वर...

# रबरी गतिरोधके ठरत आहेत अपघाताला निमंत्रण!

बीड ।प्रतिनिधी

रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी राष्ट्रीय महामार्गावरील गावचौक, शाळांसमोरील परिसर तसेच वर्दळीच्या ठिकाणी रबरी गतिरोधक बसविण्यात येतात. मात्र, अनेक ठिकाणी बसविण्यात आलेले हे गतिरोधक निकृष्ट दर्जाचे असल्याने अवघ्या काही दिवसांत तुटत असून, त्यातील लोखंडी खिळे आणि बोल्ट उघडे पडल्याने वाहनचालकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे.

ग्रामस्थांच्या मागणीनंतर

पान २ वर...




**लोखंडी खिळे उघडे पडल्याने वाहनचालक धोक्यात, निकृष्ट साहित्य वापरणाऱ्या ठेकेदारांवर कारवाईची मागणी – डॉ. गणेश ढवळे**

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे शक्य झाले यकृत प्रत्यारोपण

**पत्नीच्या यकृतदानातून पतीला मिळाले नवजीवन**

मुंबई ।प्रतिनिधी

आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे यकृत प्रत्यारोपणाचा खर्च उचलणे अशक्य झाले होते. उपचारासाठी तब्बल २५ ते ३० लाख रुपयांची आवश्यकता असताना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीमुळे अकोला येथील प्रशांत इंगळे (वय ४७) यांच्यावर मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. या प्रत्यारोपण शस्त्रक्रियेत त्यांच्या पत्नी वर्षा इंगळे यांनी स्वतःच्या यकृताचा काही भाग दान करून पतीला नवजीवन दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून प्रशांत इंगळे यांच्यासाठी २ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टाटा ट्रस्टकडून १९ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक मदतही उपलब्ध झाली. त्यामुळे एकूण २१ लाख ६० हजार रुपयांचा निधी उभारला गेला आणि अत्यंत खर्चिक असलेले यकृत प्रत्यारोपण शक्य झाले.

अशा कठीण परिस्थितीत पत्नी वर्षा इंगळे यांनी कुटुंबीयांसह अकोल्याच्या आमदारांची भेट घेतली. त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती देत मुंबईत उपचारासाठी जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांची भेट घेतली. नाईक यांनी प्रकरणाची तातडीने दखल घेत

पान २ वर...



छत्रपती संभाजीनगर – माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विभागाच्या छत्रपती संभाजी नगर येथील माहिती उपसंचालक या पदावर सोमवारी रुजू झाल्यानंतर नवनिर्वाचित माहिती व जनसंपर्क छत्रपती संभाजीनगर विभागाचे उपसंचालक श्री प्रवीण टाके सर यांना पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा देताना दैनिक समर्थ राजयोग आणि साप्ताहिक शिववाणीचे संपादक तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी.



बीड – बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी.

# बंद झालेली बस आ.नमिता मुंदडा यांनी चालू केली गावकऱ्यांनी बस चालक- वाहकाचा केला सत्कार

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

तालुक्यातील कोळकानडी, माकेगाव, हिवरा सोमनाथ बोरगाव या मार्गावरील बस वाहतूक रस्ता खराब झाल्याने बस मध्ये वारंवार बिघाड होत असल्याने अंबाजोगाई आगार प्रमुखांनी बंद केली होती.

कोळकानडी,माकेगाव,हिवरा सोमनाथ बोरगाव या दोन्ही गावचे तालुक्याच्या ठिकाणी येण्या जाण्या करिता बस एकमेव साधन बंद झाल्याने या दोन गावच्या प्रवाशांची,विद्यार्थी व अबाल




वृद्धांची प्रचंड मोठी गैरसोय होत असल्याने माकेगाव येथील नेते दिलीपराव देशमुख व हिवरा येथील भाजपाचे माजी तालुका अध्यक्ष हिंदुलाल काकडे यांनी हि बाब मतदार संघाच्या विद्यमान आमदार नमिता ताई मुंदडा यांच्या कानावर घातली. लागलीच आमदार नमिता ताई मुंदडा यांनी प्रशासनास या मार्गावरील रस्त्यावर तात्पुरता मुरूम टाकून खड्डे बुजवून घेऊन रस्ता तयार करण्याच्या

पान २ वर...


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय....

# जेथे जाऊ तेथे...

तुकाराम मुंढे सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात आहेत. मुंढेंनी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर ब्रँड, आस्थापनांना काळ्या यादीत टाकलं आहे. विविध ठिकाणी धाडी टाकून उत्पादन थांबवणं, पूर्ण आस्थापना 'सील' करणं, निकष मोडणाऱ्या बाबींवरून खटले दाखल करणं याचा त्यांनी सपाटाच लावला आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच.

सध्या बहुचर्चित असलेल्या 'जेन झी'च्या आंदोलनाचं नेतृत्व करणारा अभिजीत दीपके हा तरुण महाराष्ट्राचा असल्याने देशातील माध्यमं महाराष्ट्राची वेगळ्या पद्धतीने नोंद घेत असताना महाराष्ट्राचे डोळे सध्या दिपले आहेत, ते मात्र तुकाराम मुंढे या सनदी अधिकाऱ्याच्या कामगिरीने. मुंढे यांची २१ वर्षांची संपूर्ण कारकीर्द वादळी आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच. मुंढे यांची महाराष्ट्रात पहिली प्रसिद्धी आहे, ती त्यांच्या वारंवार होणाऱ्या बदल्यांनी. राज्यात सरकार कुणाचंही असो, मुख्यमंत्री कोणीही असो, मुंडेंना कधीच कुठल्या विभागात वर्षभर ठेवता येत नाही! त्यांच्यावर भ्रष्टाचार, अनियमिततेचे आरोप होत नाहीत. नियमबाह्य कामाबाबत त्यांच्यावर कुठे ठपका नाही. ठपका असलाच, तर काळवेळ न पाहता प्रत्येक गोष्ट नियमातील शब्दांनुसार घेण्याबाबत आहे. नियमावली आणि कायदा ते फक्त शब्दार्थाने जाणतात. भावार्थ समजून घेण्याच्या भानगडीत पडत नाहीत. त्यामुळे, त्यांचा कारभार अनेकदा आततायी होतो. लोकप्रतिनिधी, संबंधित विभागाला त्याचीच अडचण होऊ लागते. परिस्थितीनुरूप कायदे लवचिकपणे वाकवण्याची सवय झालेल्या सगळ्यांनाच त्याचा त्रास होतो.

मुंढे यांच्या विरोधातल्या तक्रारींना तिथून सुरुवात होते. मुंढे डाव–उजवं करण्याच्या फंदात पडत नाहीत. समोर आलेली फाईल कोणाशी, कशाशी संबंधित आहे, याचाही विचार करत नाहीत. त्यामुळे, त्यांच्यावर आप–परभावाचा आरोपही करता येत नाही. लोकशाहीत प्रशासन जनतेला जबाबदार असतं. लोकप्रतिनिधी हे जनतेचे प्रतिनिधी असतात. त्यांच्या भूमिका, त्यांची बाजू समजून घेण्याची गरज मुंडे यांना वाटत नाही. ते कोणाला भेटत नाहीत. बहुतेक वेळा कोणाचे फोन घेत नाहीत; कोणाला उलट फोन करत नाहीत, अशी त्यांच्या वर्तणुकीबाबतच्या तक्रारींची बरीच मोठी यादी आहे. ती सहसा बातम्यांत येत नाही. सर्वसामान्य माणसाला प्रशासनाचा जो अनुभव येतो, त्या तुलनेत मुंढेंची शैली त्याला फार भारी वाटते. मुंढेसारखा नि:स्पृह अधिकारी नाही, अशीच त्यांची प्रतिमा झाली आहे. आषाढी वारीदरम्यान काहींनी त्यांच्या नावाचा योग साधून त्यांना थेट 'आधुनिक संतश्रेष्ठ तुकाराम महाराजां'ची उपमा दिली. काहींनी त्यांच्या प्रतिमेला दुधाचा अभिषेक केला. त्यांच्यावर मराठीत येऊ घातलेल्या पुस्तकाच्या एक लाख प्रतींची नोंदणी प्रकाशनापूर्वीच झाली आहे, असं म्हणतात. एखाद्या अधिकाऱ्याच्या वाट्याला क्वचितच येणारं हे स्तुतीगानही टोकाचंच म्हणावं लागेल.मुंढे सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात आहेत. तिथे असलेल्या अधिकारांचा उपयोग करून त्यांनी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर ब्रँड, आस्थापनांना काळ्या यादीत टाकलं आहे. विविध ठिकाणी धाडी टाकून उत्पादन थांबवणं, पूर्ण आस्थापना 'सील' करणं, निकष मोडणाऱ्या बाबींवरून खटले दाखल करणं याचा त्यांनी सपाटाच लावला आहे. मुंबईतल्या जुन्या, प्रसिद्ध ब्रँडना टाळी ठोकल्याने, मोठमोठ्या–मातब्बर क्लबना नियम भंगाच्या आरोपाखाली खेचल्याने, अनेक सरकारी–न्यायालयीन इमारतींतील उपाहारगृहांनाही कायद्याचा बडगा दाखवल्याने अनेक प्रतिष्ठितांचे धाबे दणाणले आहेत. शाळांच्या आवारात आणि शाळांच्या आवारापासून ५० मीटरपर्यंतच्या परिसरात 'जंक फुड'ला बंदी केल्याने मुंढे आता मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या रडारवर आले असतील. 'जेथे जाऊ तेथे देऊ खळबळ उडवून' या बाण्याने मुंढेंचं काम सुरू असलं, तरी त्यामुळे प्रशासनाच्या वरिष्ठ वर्तुळात नेहमीच नाराजी असते. राज्यातले बाकी सगळे अधिकारी तडजोडी आणि दबावाखाली सहज झुकणारे असून मुंडे तेवढे नि:स्पृह, निर्भय आणि निष्पक्ष असल्याचं चित्र निर्माण होतं, असा या वर्तुळाचा आक्षेप असतो.

पान १ वरून..

**प्रत्येक घरावर....**

पार्श्वभूमीवर गेवराई शहरात दिनांक १४ ऑगस्ट रोजी भव्य तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीच्या संयोजक पदी युवा नेते यशराज पंडित यांची निवड जाहीर करण्यात आली. या रॅलीच्या आयोजनासाठी दिनांक ५ ऑगस्ट २०२६ रोजी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची व्यापक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजप जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, माजी जि प सभापती युधाजित पंडित, तिरंगा रॅलीचे संयोजक देविदास नागरगोजे,युवानेते शिवराज पवार, युवा नेते यशराज पंडित, युवा नेते रोहित पंडित, रॅलीचे सहसंयोजक गणेश लांडे, संध्याताई राजपूत, भाजपा तालुका समन्वयक श्रीकांत सानप, माजी तालुकाध्यक्ष प्रकाशराव सुरवसे, जिल्हा उपाध्यक्ष सुरेश हात्ते, माजी जि प अध्यक्ष मीराताई गांधले, माजी जि प सदस्य युवराज डोंगरे, माजी उपसभापती तुकाराम हराळे, निवृत्ती गोरडे, अंबादास पिसाळ, पोपटराव छाजेड, नगरसेवक शेख शेहदाद, प्रशांत राख, सज्जूभाई बागवान, सुभद्राताई थोरात, भाजयुमोचे दत्ता जाधव, भाजप सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष अमोल वडतीले, भाजप मंडळ अध्यक्ष ॲड उद्धव रासकर, सचिन दाभाडे, राजेश पवार, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी कार्यकर्त्यांनी तिरंगा रॅलीत मोटरसायकलसह मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन केले. त्यासोबतच संभाव्य पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होणार असून, या निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने आपापल्या गावातील नागरिकांशी संपर्क साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपने केलेल्या विकास कामाबाबत घराघरात प्रत्येक व्यक्तीला माहिती देऊन चर्चा करावी. या निवडणुकीसाठी भाजप कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे असे आवाहनही केले.

यावेळी बोलताना युवानेते शिवराज पवार यांनी, ही तिरंगा रॅली राष्ट्रीय एकात्मता आणि देश प्रेम वाढवणारी असणार आहे. यामध्ये भाजप पक्षाचे झेंडे राहणार नाहीत. केवळ तिरंगा ध्वज आणि राष्ट्रभक्ती या रॅलीतून दिसेल. तालुक्यातील कार्यकर्त्यांनी या तिरंगा रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन केले.

देविदास नागरगोजे यांनी रॅलीचे महत्त्व आणि नियोजन सांगितले. पत्रकार सुभाष सुतार यांचा बदामराव पंडित यांच्या हस्ते वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास अमोल करांडे, संभाजी आहेर, कैलास माने, शिवाजीराव चव्हाण, भारत मडके, वशिष्ठ शिंदे, मुकुंद बाबर, ॲड संतोष बहिर, सतीश सपकाळ, भाऊसाहेब माखले, श्रीमंत यादव, राजेंद्र रोमन, महादेव खेत्रे, शेख फत्तूभाई, डॉ शेख इलियास, जगदीश मस्के, महादेव आवटी, विलास

**बालस्नेही महाराष्ट्र....**

अधिकारी उपस्थित होते.

शाळा व महाविद्यालयांमध्ये सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण, मुलींसाठी पिंक रूम, कार्यान्वित 'सखी–सावित्री संवाद पेटी', स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, सुरक्षित वाहतूक व सुरक्षाविषयक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच बीड जिल्ह्यातील स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी शिक्षण हमी कार्डाचा वापर, स्थलांतरित मुलांचा पाठपुरावा, बालविवाह रोखल्यानंतर संबंधित मुलींच्या शिक्षणावर लक्ष ठेवणे तसेच सलग अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची गृहभेट घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यावर भर देण्यात आला.

बालमजुरी प्रतिबंधासाठी कामगार विभागाने सतर्क राहावे, स्थलांतरित कामगारांच्या मुलांसाठी हंगामी वसतिगृहे उपलब्ध करावीत तसेच अनाथ बालकांना आवश्यक कागदपत्रे व अनाथ प्रमाणपत्र तातडीने उपलब्ध करून द्यावीत, अशा सूचनाही आयोगाने दिल्या. राज्यातील 'बालस्नेही पंचायत' अभियानासाठी निवडलेल्या १०० गावांमध्ये बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील पिंपळगाव, बीड तालुक्यातील बोरफडी आणि धारूर तालुक्यातील हिंगणी या गावांची निवड झाल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

**मुख्यमंत्री सहाय्यता....**

आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी तसेच टाटा ट्रस्टकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रभावी पाठपुरावा केला.

या आर्थिक सहाय्यामुळे २५ जून २०२६ रोजी मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाल्याने १३ जुलै २०२६ रोजी प्रशांत इंगळे यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून ते हळूहळू पूर्णपणे बरे होत आहेत.

वेळेवर मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे आपल्याला नवजीवन मिळाल्याची भावना व्यक्त करत इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक तसेच टाटा ट्रस्ट यांचे मनःपूर्वक आभार मानले.

पान १ वरून..

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचा उपचार पैशांअभावी थांबू नये, या उद्देशाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष सातत्याने कार्यरत आहे. त्याच भावनेतून प्रशांत इंगळे यांना वेळेत आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून देता आली, याचा आम्हाला आनंद आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहितीसाठी नागरिकांनी १८०० १२३ २२११ या टोल–फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

–रामेश्वर नाईक
कक्ष प्रमुख
मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष

**रबरी गतिरोधके ....**

जिल्हा सुरक्षा समितीच्या आदेशानुसार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून रबरी गतिरोधक बसविण्यात येतात. परंतु, निकृष्ट साहित्यामुळे हे गतिरोधक आठवडाभरातच खराब होत आहेत. तुटलेल्या गतिरोधकांमधील धारदार खिळ्यांमुळे वाहनांचे टायर पंक्चर होणे, दुचाकी घसरून अपघात होणे आणि रात्रीच्या वेळी खिळे न दिसल्याने गंभीर दुखापती होण्याच्या घटना वाढल्या आहेत.

या धोकादायक परिस्थितीमुळे वाहनचालक आणि ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण असून, प्रशासनाने तातडीने सर्व तुटलेल्या गतिरोधकांवरील उघडे लोखंडी खिळे काढून टाकावेत, खराब झालेल्या रबरी गतिरोधकांची दुरुस्ती करावी किंवा त्याऐवजी दर्जेदार नवीन गतिरोधक बसवावेत, तसेच निकृष्ट साहित्य वापरणाऱ्या संबंधित ठेकेदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जिल्हा सुरक्षा समिती आणि वाहतूक शाखेचे अधिकारी वैभव पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

**बंद झालेली बस ..**

सूचना दिल्या. लागलीच प्रशासनाने खड्डे बुजवून रस्ता वाहतुकी योग्य केला.लागलीच अंबाजोगाई आगार प्रमुखांनी या मार्गावरील बस वाहतूक पूर्ववत सुरू केली.अनेक दिवसापासून बंद झालेली बस सुरू झाल्याने गावकऱ्यांनी आनंद व्यक्त केला व बस चालक वाहक यांचा सत्कार केला.या वेळी भाजपाचे माजी तालुका अध्यक्ष हिंदुलाल काकडे,दिलीपराव देशमुख, जयदत्त देशमुख,लालासाहेब वाघमारे, प्रशांत कांबळे, ज्ञानोबा देशमुख,उपसरपंच मारुती देशमुख,वंचित बहुजन युवा आघाडीचे नेते अजय वाघमारे,समीर देशमुख विद्यार्थी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार नमिताताई मुंदडा यांचे जाहीर आभार...

कोळकानडी व माकेगाव हे दोन्ही गाव मुख्य रस्त्यावर असल्याने या गावांना वाहतूक कमी आहे. या गावातील विद्यार्थी व नागरिकांची येणे जाण्याची सोय फक्त बस वरच अवलंबून आहे. रस्ता खराब झाल्याने बस बंद झाली होती. आम्ही ही तक्रार आमदार नमिता ताई मुंदडा यांच्या कानावर घातल्याने ताईंनी रस्ता दुरुस्त करून बस चालू करून दिली. त्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने आभार मानले.



**बीड – येथील चंपावती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे ग्रंथपाल उत्तम राठोड हे सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचा महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटना बीडच्या वतीने सत्कार करताना जिल्हाध्यक्ष संजय डावकर, उपाध्यक्ष शेख मोहसीन, संदीप वनवे, सतीश बहीर, भीमराव घोडके, खमर नाज आदि.**


**जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/४५५**
**कार्यालय नगर परिषद, अंबड**
**दिनांक :–०८/०७/२०२६**
**नांव बदलण्याचा**

## जाहिरनामा

**अर्जदार श्री. सौ. श्रीमती आरेफ परवीन व जमील अहेमद खान**
**प्रकरण–सिटी सर्वे नंबर १३६९ न प घर नं ९–११०**
**हस्तातरण करणे बाबत**

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (९–११०) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जायेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा, नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसिमा
पुर्व :– विखार सर यांचे प्लॉट
पश्चिम :– हुमेरा सोहेल चाउस यांचे घर
दक्षिण:– मुख्तारभाई किराणा दुकान
उत्तर :– सरकारी रस्ता

**स्वाक्षरित/–**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५५९/२०२६**
**हरिभाऊ पि. नाथा नन्नवरे व इतर वि. निरंक**
**मार्फत – ॲड आर. एल. मस्के गेवराई**

अर्जदार
१. हरिभाऊ पि. नाथा नन्नवरे वय ४६ वर्षे, धंदा – शेती रा. गोळेगाव, ता. गेवराई जि. बीड
२. लक्ष्मण पि. नाथाराव नन्नवरे वय ४३ वर्षे, धंदा – शेती रा. गोळेगाव, ता. गेवराई जि. बीड

ज्याअर्थी मयत शकुंतलाबाई भ्र. नाथाजी नन्नवरे हे/हया अनुक्रमे दिनांक ०९/०३/२०२३ रोजी मौजे गोळेगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत शकुंतलाबाई भ्र. नाथाजी नन्नवरे रा. गोळेगाव ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३१/०७/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीखः– १५/०९/२०२६

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५७७/२०२६**
**बानुबी मन्सूर शेख आणि इतर वि. निरंक**
**(मार्फत– ॲड. के. व्ही. लोंढे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे मन्सुर इब्राहिम शेख, रा. सुशी, ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक २३/१२/२०२२ रोजी रा. सुशी ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ बानुबी मन्सुर शेख, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. सुशी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ इनुस मन्सूर शेख, वय ४५ वर्षे, धंदा मजुरी, रा. सुशी वडगांव ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ३ समीना अनिस शेख, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा. सुशी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ४ सोफियान अनिस शेख, वय १७ वर्षे, धंदा शिक्षण अज्ञान अपाक आई अर्जदार क्र. ३ समीना अनिस शेख, रा. सुशी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ५ आलिया अनिस शेख, वय १३ वर्षे, धंदा शिक्षण अज्ञान अपाक आई अर्जदार क्र. ३ समीना अनिस शेख, रा. सुशी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ६ जिशान अनिस शेख, वय ०९ वर्षे, धंदा शिक्षण अज्ञान अपाक आई अर्जदार क्र. ३ समीना अनिस शेख, रा. सुशी ता. गेवराई जि.बीड सदर यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत मन्सुर इब्राहिम शेख यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०४/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.
पुढील तारीख – ३०/०९/२०२६

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ५६१/२०२६**
**कृष्णा – विरूध्द – निरंक**
**(मार्फत ॲड वावरे ए.के.)**

ज्यार्थी मयत नामे १.गोरखनाथ पु. दादाराव आडाळे हे दि.१५.०६.२०२२ रोजी मौजे भाटेपुरी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत. तसेच मयत नामे २. भागीत्रीबाई प्र. गोरखनाथ आडाळे या दि.२०२४ रोजी मौजे भाटेपुरी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार
१. कृष्णा पि. गोरखनाथ आडाळे वय ३५ वर्षे धंदा – शेती रा.भाटेपुरी ता. गेवराई जि.बीड २ लताबाई प्र ज्ञानदेव मोघे वय ५३ वर्षे धंदा–शेती रा. पोखरी ता. गेवराई जि. बीड ३ मिना न सर्जेराव उबाळे वय ४८ वर्षे, धंदा शेती रा. भेंड ता. गेवराई जि.बीड. ह.मु.प्लॉट नं. १ ग्राउंड फ्लोअर लीलावती कृपा निवास, नेट ग्रामपंचायत ऑफीस कुंजीरवाडी, पुणे ता.जि.पुणे ४.रुख्मीनी न. अशोक खोसे वय ४५ वर्षे, धंदा– शेती रा. ढोर जळगाव ता. शेवगाव जि. अ.नगर. ५. रंजना प्र. बापुराव इकर वय ४२ वर्षे, धंदा– शेती रा. भाटेपुरी ता. गेवराई जि.बीड ६.वंदना ब्र. संभाजी कडे वय ७५ धंदा– शेती रा.भाटेपुरी पो. खांडवी ता. गेवराई जि.बीड ७.मनीषा भ्र जयराम कचरे वय ३३ वर्षे धंदा– शेती रा. जयराम कचरे १२० जिल्हा परिषद शळेजवळ मु. पो. राजेगाव ता. माजलगाव जि. बोड शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

मुंबई त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे १) गोरखनाथ पि. दादाराव आडाळे रा. भाटेपुरी ता. गेवराई जि. बीड व २) भागीत्रीबाई भ्र. गोरखनाथ आडाळे रा. भाटेपुरी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख : १५.०९.२०२६

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि–६१६ दि.१७.०७.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अब्दुल खालेद अब्दुल रहेमान शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अब्दुल खालेद अ.रहेमान शेख | स्वतः | १७.१२.१९६४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– –/–/– रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि–६०१ दि.२२.०६.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख फारूख खलील, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख फारूख खलील | स्वतः | ०४.०५.१९७९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– –/–/– रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि–६०० दि.२२.०६.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख अजीम खलील, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख अजीम खलील | स्वतः | २२.०३.१९८५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– –/–/– रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि–६०२ दि.२२.०६.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **सलीम खलील शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सलीम खलील शेख | स्वतः | १२.०४.१९८३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– –/–/– रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# सौर ऊर्जेच्या आधारे कृषी सिंचनाचे महाराष्ट्र मॉडेल जागतिक पातळीवर उपयुक्त

## अपर मुख्य सचिव श्री. लोकेश चंद्र यांचे प्रतिपादन

मुंबई ।प्रतिनिधी

मुख्यमंत्री सौर कृषी योजना २.० आणि मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याने सौर ऊर्जेच्या आधारावर कृषी सिंचनात लक्षणीय यश मिळविले आहे. त्यासोबत ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासोबतच रोजगार निर्मितीला मदत होत आहे. सौरऊर्जा वापराचे महाराष्ट्राचे हे मॉडेल देशातील अन्य राज्यांसोबतच जागतिक पातळीवरील विकसनशील राष्ट्रांसाठी उपयुक्त ठरले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी बुधवारी मुंबईत केले.

महावितरण, एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इनव्हेस्टमेंट बँक (एआयआयबी) आणि 'मित्रा' यांनी कृषी सिंचनासाठी सौरऊर्जेचा वापर या विषयावर आयोजित केलेल्या एक दिवसीय चर्चासत्राचे उद्घाटन करताना मा. लोकेश चंद्र बोलत होते. यावेळी 'मित्रा' या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, कृषी सल्लागार सुधीरकुमार गोयल, महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार आणि संचालक (प्रकल्प) सचिन तालेवार उपस्थित होते. एआयआयबीचे वरिष्ठ गुंतवणूक अधिकारी प्रत्युष मिश्रा यांच्यासह वरिष्ठ अधिकारी चर्चासत्रास उपस्थित होते.

मा. लोकेश चंद्र म्हणाले की, मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३० पर्यंत ऊर्जावापरात नवीकरणीय उर्जेचा वाटा किमान ५० टक्के असावा, असे निश्चित केले आहे. मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना दिवसा व भरवशाचा वीज पुरवठा करण्यावर भर देतानाच शेतीसाठी नवीकरणीय ऊर्जेचा पुरवठा करण्याची सूचना केली आहे. त्यानुसार महावितरणने मार्च २०२७ अखेर राज्यातील कृषी सिंचनासाठी शंभर टक्के वीज पुरवठा सौरऊर्जेद्वारे करण्याचे नियोजन केले आहे.

त्यांनी सांगितले की, राज्यात आतापर्यंत ११ लाख सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले असून त्यामुळे ११ लाख शेतकऱ्यांना लाभ झाला असून ४० लाख एकर शेतीमध्ये सिंचनाची सुविधा निर्माण झाली आहे. तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी



योजना २.० अंतर्गत आतापर्यंत सहा हजार मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. कृषी सिंचनासाठी सौर ऊर्जेच्या वापरामुळे शेतकऱ्यांना सिंचनाची भरवशाची सुविधा मिळण्यासोबतच हवामान बदलाच्या विपरित परिणामांचा सामना करण्यास मदत होते.

ते म्हणाले की, सिंचनासाठी सौर ऊर्जा वापरण्यामुळे खर्चात मोठी बचत होते तसेच पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर होतो. ब्राझिल येथे जागतिक हवामान परिषदेत महाराष्ट्राचे सिंचनासाठी सौर ऊर्जा वापराचे मॉडेल मांडल्यानंतर त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. विकसनशील देशांमध्ये या मॉडेलचा वापर करण्याबाबत महावितरणचा इंटरनॅशनल सोलर अलायन्ससोबत सामंजस्य करार झाला आहे. देशातील इतर राज्ये महाराष्ट्र मॉडेलचे अनुकरण करत आहेत. एआयआयबीच्या माध्यमातून इतर विकसिनशील राष्ट्रांमध्ये महाराष्ट्र मॉडेल राबवता येईल.

मा. लोकेश चंद्र यांनी सांगितले की, सौर कृषी पंप बसविण्यामध्ये महाराष्ट्र राज्याने देशात आघाडी घेतली आहे. देशातील एकूण सौर कृषी पंपांपैकी ६५ टक्के पंप महाराष्ट्रात बसविण्यात आले आहेत. एका महिन्यात ४५,९११ सौर पंप बसवून राज्याने गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे. त्यासोबत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहेत. या दोन योजनांमुळे ग्रामीण भागात फार मोठी आर्थिक गुंतवणूक होत असून त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कायापालट होत आहे. योजनेची अंमलबजावणी झालेल्या क्षेत्रातील अभ्यासात या दोन योजनांचा ग्रामीण भागात जीवनमान उंचावल्याचे दिसत आहे.

मा. प्रवीण परदेशी म्हणाले की, कृषी पंपांना ऊर्जा पुरविण्यासाठी कोळशाच्या वापरापासून नवीकरणीय ऊर्जेच्या वापराच्या परिवर्तनाच्या बाबतीत महाराष्ट्राने चांगले यश मिळविले आहे. 'मित्रा' या संस्थेने राज्यातील कृषी पंपांसह विविध बाबींची माहिती एकत्रित केली असून तिचा उपयोग अचूक धोरणात्मक निर्णयासाठी होत आहे.

मा. मुख्यमंत्र्यांचे जलधोरण सल्लागार श्रीराम वेदिरे यांनी पाणी व संबंधित संसाधनांची माहिती व व्यवस्थापन (वारिम्स) या संदर्भात निर्णयप्रक्रियेत जीआयएस प्रणालीचा वापर याविषयी सादरीकरण केले. भूजल साठा ध्यानात घेऊन ऊर्जेचा वापर करावा, सौरऊर्जेच्या आधारे सिंचन करताना त्याचा जलपुनर्भरणाशी संबंध जोडावा आणि स्थानिक पातळीवरील पाणीवापर संस्थांना सबळ करावे अशा शिफारशी त्यांनी केल्या.



# माजी आमदार भिमराव धोंडे यांचा वाढदिवस साजरा

पाटोदा । प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान देत आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघात शिक्षणाचे भक्कम जाळे उभारणारे आणि सलग २० वर्षे आमदार म्हणून जनतेची सेवा करणारे शिक्षणसम्राट माजी आमदार भिमराव धोंडे यांचा वाढदिवस दरवर्षी ५ ऑगस्ट रोजी बीड व नगर जिल्ह्यात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.मात्र यावर्षी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या अकाली निधनामुळे कोणताही वाढदिवसाचा जल्लोष करू नये, असे आवाहन स्वतः माजी आमदार भिमराव धोंडे यांनी कार्यकर्त्यांना केले आहे. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत कार्यकर्त्यांनी वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्याचा निर्णय घेतला.

त्याच अनुषंगाने पाटोदा येथील संत बाळुदेव महाराज विद्यालय व प्रियदर्शनी प्राथमिक शाळा येथे स्वामी सानप यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपणही करण्यात आले.

या प्रसंगी सभापती अनिल जायभाय सर,प्राचार्य बोखारे सर, राठोड सर, देसाई सर, वाघ सर, मोहळकर सर, शेख ए. आय. सर, जावळे सर, मोरे सर, चौरे सर, प्रा. येवले मॅडम, प्रा. कोल्हे मॅडम, थोरवे मॅडम, जायभाय मॅडम, तसेच प्रियदर्शनी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यक मोरेसर सह अमोल जाधवर, राम देसाई, बाबासाहेब चव्हाण, गौतम चंदनशिव तसेच पठाण आयान यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-८८० दि.१४.०७.२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **आसिया म.युसूफ पटेल, रा.पाऊटा वार्ड, दुर्गावाडी पैठण ता.पैठण जि.छ.संभाजीनगर** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आसिया म.युसुफ पटेल | स्वतः | १०.०९.१९६७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-९३१ दि.३०.०७.२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मदन बापुराव ढोले, रा.आपेगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **भाऊ**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मोहन बापुराव ढोले | भाऊ | ०४.११.२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-६१५ दि.१७.०७.२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मुमताज बेगम अब्दुल रहेमान रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मुमताज बेगम अ.रहेमान | स्वतः | ०१.१०.१९७७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-७५० दि.२९.०७.२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **नसीम रहीम शेख, रा.सोनक पिंपळगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | नसीम रहीम शेख | स्वतः | ०१.०१.१९५० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१०६९ दि.०३.०८.२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **डिगांबर मनोहर पवार, रा.भार्डी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आदर्श डिगांबर पवार | मुलगा | ११.०३.२०१८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१००३ दि.०३.०८.२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **कैलास पंडित मैंद, रा.झीर्पी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अनिकेत कैलास मैंद | मुलगा | २१.१०.२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१००४ दि.०३.०८.२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **कैलास पंडित मैंद, रा.झीर्पी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पांडुरंग कैलास मैंद | मुलगा | १६.०९.२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१००५ दि.०३.०८.२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **कैलास पंडित मैंद, रा.झीर्पी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अमृता कैलास मैंद | मुलगी | १४.०४.२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-६६० दि.०३.०८.२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **विमल अशोक वीर, रा.बठाण खु. ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | संस्कृती अशोक वीर | मुलगी | १४.०८.२०१३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१०६२ दि.०३.०८.२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **तुकाराम निवृत्ती घोडके, रा.भार्डी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | तुकाराम निवृत्ती घोडके | स्वतः | १४.०५.१९९० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०३/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१०६८ दि.०३.०८.२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **डिगांबर मनोहर पवार, रा.भार्डी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आदिती डिगांबर पवार | मुलगी | १९.०१.२०१५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०३/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१०७० दि.०३.०८.२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **डिगांबर मनोहर पवार, रा.भार्डी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अनूष्का डिगांबर पवार | मुलगी | ०९.०३.२०१३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# सिडको वाळूज महानगराच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्य प्रशासकांना निवेदन

**पी. एस. गुजर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने सिडको मुख्य प्रशासकांची भेट घेऊन; स्वच्छता, प्लास्टिक बंदी, औषधी वनस्पती उद्यान व उद्यानांच्या आधुनिकीकरणाची प्रमुख मागणी**

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

सिडको वाळूज महानगर परिसर स्वच्छ, सुंदर, हरित व पर्यावरणपूरक बनविण्याच्या उद्देशाने महानगर नागरी विकास कृती समितीच्या वतीने पी. एस. गुजर यांच्या नेतृत्वाखाली मुख्य प्रशासक, सिडको महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांची भेट घेऊन विविध नागरी प्रश्नांबाबत सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी मुख्य प्रशासकांच्या पुनर्नियुक्तीबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर महानगरातील स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, सार्वजनिक आरोग्य आणि नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध मागण्या मांडण्यात आल्या.

निवेदनामध्ये सिडको वाळूज महानगर परिसरात प्लास्टिक कॅरीबॅग वापरावरील बंदीची कडक अंमलबजावणी, उघड्यावर कचरा




टाकणाऱ्या नागरिक व व्यावसायिकांवर कारवाई करण्यासाठी २४ह७ अधिकारीस्तरीय दक्षता पथकाची स्थापना, तसेच ख ङजतए ऋठएएछ च-क-छ-ऋ-ठ या अभियानांतर्गत दर महिन्याला नागरिकांच्या सहभागातून स्वच्छता मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली.

याशिवाय सिडकोच्या ग्रीन बेल्ट व खुल्या जागांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून आयुर्वेदिक औषधी वनस्पती उद्यान विकसित करण्याची मागणी करण्यात आली. या उद्यानांसाठी पाणीपुरवठा, सिंचन व्यवस्था, ज्येष्ठ नागरिकांसाठी बाके, पादचारी मार्ग, सुरक्षा रक्षक आणि जनजागृती उपक्रम राबविण्याची सूचनाही निवेदनात करण्यात आली.

सार्वजनिक उद्याने व खुल्या जागा अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी मजबूत कंपाउंड वॉल उभारण्याबरोबरच मध्यवर्ती मुख्य उद्यानाचे आधुनिकीकरण करून आधुनिक खेळणी, ओपन जिम, संगीतमय कारंजे, आकर्षक प्रकाशयोजना, बैठकीची व्यवस्था, स्वच्छ पिण्याचे पाणी आणि सार्वजनिक स्वच्छतागृह उभारण्याचीही मागणी करण्यात आली.

मुख्य प्रशासकांनी निवेदनातील मागण्यांचा सकारात्मक विचार करून संबंधित विभागामार्फत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.यावेळी पी. एस. गुजर यांच्यासह सतीश कुलकर्णी, दिगंबर येवले आणि दावल अडांगळे हे शिष्टमंडळात सहभागी होते. महानगराच्या स्वच्छ, हरित व शाश्वत विकासासाठी नागरिकांनीही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# वर्तमानपत्रांच्या वृत्ताची दखल घेत तडखेल-उंद्री रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम तात्काळ सुरू

मुखेड ।प्रतिनिधी

बाराहाळी-जाहूर-उंद्री-खानापूर मार्गावरील खड्ड्यांच्या गंभीर समस्येबाबत दैनिक श्रमिक लोकराज्यमध्ये सातत्याने प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची अखेर संबंधित प्रशासनाने दखल घेत तडखेल ते उंद्री या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम सुरू केले आहे.

या मार्गावर ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालक, शेतकरी, विद्यार्थी व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचून अपघाताचा धोका वाढला होता. या जनहिताच्या प्रश्नावर पत्रकारांनी मागील वर्षभर सातत्याने वृत्तांकन करून प्रशासनाचे लक्ष वेधले.

तसेच पत्रकार बालाजी शिंदे, पत्रकार मारोती पाटील वडजे, व पत्रकार मनोज पाटील बिरादार, यांनीही विविध माध्यमांतून या प्रश्नाची सातत्याने मांडणी केली.




याशिवाय परिसरातील जागरूक ग्रामस्थांनी समाजमाध्यमांवर आवाज उठवत या मागणीला व्यापक लोकसमर्थन मिळवून दिले.

या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांची दखल घेत संबंधित विभागाने तातडीने हालचाल करून तडखेल-उंद्री रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे वाहनचालक व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

मात्र, नागरिकांनी केवळ खड्डे बुजविण्यावर समाधान न मानता बाराहाळी-जाहूर-उंद्री-खानापूर या दोन राष्ट्रीय महामार्गांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या मार्गाचे दर्जेदार डांबरीकरण, मजबुतीकरण व आवश्यकतेनुसार रुंदीकरण करून कायमस्वरूपी पुनर्बांधणी करण्याची मागणी केली आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावरील टीकेचे परळीत पडसाद, राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी सपकाळांच्या फोटोला मारले जोडे

## परळी राष्ट्रवादी काँग्रेसने काँग्रेसचा केला जाहीर निषेध

परळी ।प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांच्या विषयी बेताल वक्तव्य करणाऱ्या काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रतिमेला परळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने जोडे मारून काँग्रेस पक्षाचा जाहीर निषेध आंदोलन करून करण्यात आले.

सुनेत्रा पवार यांच्या विषयी काँग्रेसच्या सोशल मीडिया हँडलवरून करण्यात आलेल्या वक्तव्यामुळे राज्यात सर्वत्र काँग्रेसची नाचक्की होत असून, हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्या टीमला समज देण्याऐवजी टीकेचे समर्थन केले तसेच धनंजय मुंडे यांच्या बाबतीतही बेताल वक्तव्य केल्याने परळी वैद्यनाथ तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले होते. त्यांनी हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रतिमेस जोडे मारत काँग्रेसच्या या कृत्याचा निषेध नोंदवला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष तथा नगरपरिषदेचे गटनेते वैजनाथ सोळंके, शहराध्यक्ष आयुबभाई पठाण, सरचिटणीस आनंत इंगळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक तालुकाध्यक्ष गोविंद कराड, नगरसेवक दीपक मुंडे, लक्ष्मण उर्फ पिंटू मुरकुटे, भीमराव डावरे, जयराज देशमुख, अजीज कच्ची, माजी नगरसेवक शकील भाई कुरेशी, सामाजिक न्याय तालुका अध्यक्ष दत्ताभाऊ सावंत, माजी उपनगराध्यक्ष रवींद्र परदेशी, रमेशअण्णा



भोईटे, शंकर कापसे, दीपक कुरील,अजीम नवाब, रवी मुळे, एजासभाई, सुरेश नानवटे, शिवराज सुरवसे चंद्रप्रकाश हालगे, अजगर मणियार, राजूभाई मेकानिकल, तक्की खान, अली खान, जुबेर कच्ची, शंकर घोडके, विश्वजीत कांबळे, विलास जुनाळ, शुभम आवाड, गिरीश भोसले यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# प्रत्यक्ष लेखकाच्या भेटीने यशवंत विद्यालयात रंगली 'कौतुकाची थाप'

**उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त व शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या वाढदिवसानिमित्त 'लेखक आपल्या भेटीला' हा प्रेरणादायी उपक्रम संपन्न**

बीड ।प्रतिनिधी

शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित यशवंत विद्यालयात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त व शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या वाढदिवसानिमित्त 'लेखक आपल्या भेटीला' हा प्रेरणादायी उपक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गणेश वाघ होते. व्यासपीठावर लेखक आयुब पठाण लोहगावकर, सचिव नामदेवराव वाघ, दीपक दादा घुमरे, रवींद्र खोड, महेश घरत व मधुकर धुमाळ उपस्थित होते.

यावेळी आ. विक्रम काळे यांनी शिक्षणामुळे माणसाचा विकास आणि प्रगती होते. चांगला अभ्यास करा, मेहनत करा आणि मराठी विषयात एकही विद्यार्थी नापास होऊ नये, असे आवाहन केले. मराठवाड्यातील ४० व बीडमधील ७ शाळांत हा विशेष उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच जुनी पेन्शन,



शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा बोजा, डिजिटलायझेशन आदी विषयांवर शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले.

प्रास्ताविकात गणेश वाघ यांनी विद्यालयाची निवड विशेष शैक्षणिक उपक्रमासाठी झाल्याची माहिती दिली. इयत्ता चौथीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील 'कौतुकाची थाप' या पाठाचे लेखक आयुब पठाण लोहगावकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत कथाकथनातून जुनं ते सोनं, नवं ते हवं हा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेळके सर यांनी केले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठवाड्यातील उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण करा - विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

छत्रपती संभाजीनगर, (विमाका)

मुख्यमंत्री यांच्या विकसित महाराष्ट्र धोरणानुसार मराठवाड्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी औद्योगिक विकासाला चालना देणे अत्यावश्यक असून विभागातील उद्योगांशी संबंधित विविध समस्या तत्परतेने सोडवून उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जी श्रीकांत यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) संदर्भातील विविध समस्या आणि उपाययोजनांच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालयात दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकारी, औद्योगिक संघटना आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत विभागातील एकूण औद्योगिक भूखंड, वाटप झालेली व शिल्लक भूखंड, बंद पडलेल्या उद्योगांची कारणे तसेच औद्योगिक विकासातील अडचणींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी आणि विविध उद्योजक संघटनांच्या प्रतिनिधींनी सूचना व मते मांडली.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत म्हणाले की, मराठवाड्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी औद्योगिक विकासाला गती देणे आवश्यक आहे. त्यासाठी



उद्योगांशी संबंधित समस्या तातडीने सोडविणे आवश्यक असल्याचे सांगितले. उद्योगांना आवश्यक कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मार्फत दर्जेदार तांत्रिक व व्यवहारिक कौशल्य प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. त्यासाठी आयटीआय महाविद्यालयांना आवश्यक त्या सर्व सेवा सुविधा पुरविण्यात याव्यात. तसेच औद्योगिक वसाहतींमध्ये रस्ते, पाणी, वीज आणि इतर मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच घनकचरा व्यवस्थापनाचे नियोजन करण्यावर त्यांनी यावेळी प्रमुख भर दिला.

तसेच बाहेरून येणारे उद्योग कोणत्याही अडचणींमुळे बंद पडणार नाहीत किंवा जिल्हा सोडून जाणार नाहीत, यासाठी आवश्यक त्या कठोर संरक्षणात्मक उपाययोजना राबविण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

एमआयडीसी क्षेत्रातील भूखंडाचे वाटप झाल्यानंतर विहित मुदतीत उद्योग सुरू होणे आवश्यक असून, उद्योग उभारणीसाठी लागणाऱ्या अनावश्यक परवानग्या कमी करून परवानगी प्रक्रिया अधिक सुलभ व वेगवान करण्यावर भर देऊन परवानगी प्राप्त झाल्यानंतर विहित मुदतीत सुरू न झालेल्या उद्योगांबाबत योग्य ती कारवाई करण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# शिक्षण आणि राजकारण क्षेत्रातील धुरंधर हरपला

## पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे निधन

कोल्हापूर : प्रतिनिधी

देशातील शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देणारे शिक्षणमहर्षी, माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. ज्ञानदेव यशवंतराव पाटील अर्थात डॉ. डी. वाय. पाटील यांचे सोमवार, दि. ४ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९१ वर्षांचे होते. कोल्हापूरच्या कसबा बावडा येथील त्यांच्या यशवंत निवासस्थानी सकाळी ११ च्या सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने राज्यासह देशभरातील शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात हळहळ व्यक्त होत असून, सामाजिक, राजकीय शिक्षण क्षेत्रातील एक धुरंधर हरपल्याची भावना राज्यासह देशभरातील मान्यवरांनी व्यक्त केली. माजी मंत्री काँग्रेस नेते सतेज पाटील यांचे ते वडील होत.

पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत उच्च शिक्षणाच्या संधी पोहोचविण्याचा ध्यास घेत अनेक शैक्षणिक संस्था उभारल्या. डी. वाय. पाटील यांच्या नावाच्या अनेक संस्था महाराष्ट्रात आहेत. या माध्यमातून वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, व्यवस्थापन आणि इतर विविध शाखांमध्ये त्यांनी उभारलेली शैक्षणिक व्यवस्था आज देशभरातील लाखो विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे केंद्र बनली आहे. शिक्षणाबरोबरच समाजकारण आणि सार्वजनिक जीवनातही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. बिहार, त्रिपुरा आणि पश्चिम बंगाल या राज्यांचे राज्यपाल म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली. शिक्षण, आरोग्य, राजकारण, क्रीडा, कला, संस्कृती आणि अध्यात्म या सर्व क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे.



पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचा जन्म २२ ऑक्टोबर १९३५ रोजी कोल्हापूरमधील अंबप गावात झाला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सदस्य असलेले डी. वाय. पाटील १९५७ ते १९६२ दरम्यान कोल्हापूरचे महापौर होते. १९६७ ते १९७२ साली पन्हाळा विधानसभा मतदारसंघामधून विधानसभेवर निवडून आले. सर्वसामान्य कार्यकर्त्यांपासून सुरू केलेली राजकीय कारकीर्द पुढे अनेक मोठ-मोठ्या पदांपर्यंत घेऊन गेली. कार्यकर्ता, महापौर ते विविध राज्यांचे राज्यपाल असा त्यांचा विस्मयकारक प्रवास राहिला आहे.

खा. धनंजय महाडिक, आमदार अमल महाडिक, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री प्रकाश आबिटकर, आमदार चंद्रदीप नरके यांच्यासह विविध राजकीय नेत्यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत श्रद्धांजली वाहिली. डॉ. डी. वाय. पाटील यांच्या अंत्यसंस्कारासाठी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यासह विविध पक्षांचे वरिष्ठ नेते, लोकप्रतिनिधी, शिक्षणतज्ज्ञ आणि समाजातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# 'एसआयआर'ला १७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

मुंबई : राज्यात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमास १७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यात सरासरी ७५ टक्के एसआयआर प्रक्रिया पूर्ण झाली असून मुंबई, ठाणेसारख्या भागातील डिजिटायझेशनचे प्रमाण ५० टक्केंच्या आसपास आहे.




या पार्श्वभूमीवर या प्रक्रियेला मुदतवाढ देण्याची विनंती राज्याच्या मुख्य निवडणूक अधिका-यांमार्फत भारत निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती. आयोगाने राज्यातील सर्व निवडणूक अधिकारी, जिल्हा प्रशासन आणि संबंधित यंत्रणांना सुधारित वेळापत्रकाची तत्काळ माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत.तसेच सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनाही सुधारित कार्यक्रमाची लेखी माहिती देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीतील त्रुटी दूर करणे, नव्या मतदारांची नोंदणी, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे आणि मतदान केंद्रांचे पुनर्रचनेचे काम वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने आयोगाने हा सुधारित कार्यक्रम जाहीर केल्याचे मानले जात आहे.

# केज, किनवट, सिल्लोड येथे नवीन न्यायालये

मुंबई : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड, तसेच नांदेड जिल्ह्यातील किनार येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयासह सरकारी वकील कार्यालय, तसेच बीड जिल्ह्यातील केज येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापन करण्यास आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यासाठी अतिरिक्त पदनिर्मितीला व त्यासाठीच्या खर्चाला मान्यता देण्यात आली आहे.



पिंपरी चिंचवड (जि. पुणे) येथे विशेष मोटार वाहन न्यायालय स्थापन करण्यासही आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. पिंपरी-चिंचवड येथील प्रलंबित प्रकरणांची संख्यूा लक्षात घेता विशेष मोटार वाहन न्यायालय स्थापन करण्याचा प्रस्ताव प्रधान जिल्हा आणि सत्र न्यायाधीश यांनी सादर केला होता. त्यावर उच्च न्यायालयाच्या समितीनेही शिफारस केली. त्यानुसार आज न्यायालय स्थापन करण्यास, आवश्यक पदांना आणि त्यासाठी येणा-या खर्चास मंजुरी देण्यात आली. मोटार वाहन न्यायालय, जिल्हा न्यायालय, पुणे येथे १ लाख २० हजार १२८ प्रकरणे प्रलंबित आहेत. यापैकी ४७ हजार ८०६ प्रकरणे पिंपरी चिंचवडमधील आहेत. पिंपरी चिंचवड परिसराचा विस्तार वाढत आहे. त्याचबरोबर पिंपरी चिंचवड येथे स्वतंत्र वाहतूक शाखा आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय आहे. मात्र पिंपरी चिंचवड येथील प्रकरणातील नागरिकांना शिवाजी नगर, पुणे येथे जावे लागते. न्यायालयीन कामकाजासाठी शासकीय यंत्रणा आणि नागरिक यांच्यासाठी पिंपरी-चिंचवड येथील विशेष मोटार न्यायालय सोयीचे ठरणार आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आष्टीच्या महाआरोग्य शिबिरात जनसागर

## ६५ हजारांची ऐतिहासिक उपस्थिती

### गोरगरिबांच्या सेवेसाठी विधायक उपक्रम-अमृता फडणवीस

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराच्या समारोप सोहळ्याला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांसह नागरिकांची तब्बल ६५ हजारांहून अधिक उपस्थिती लाभल्याने हा उपक्रम आष्टी तालुक्याच्या इतिहासातील सर्वात मोठ्या आरोग्य उपक्रमांपैकी एक ठरला.

समारोप सोहळ्यास प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या अमृता फडणवीस यांनी वाढदिवस साजरा करण्याची सामाजिक जाणीव अधोरेखित करत, देशातील बळीराजा सातत्याने कष्ट करत असल्यामुळे तो सुदृढ आहे आणि बळीराजा सुदृढ असल्यामुळेच भारत देश सशक्त आहे. वाढदिवसावर अनावश्यक खर्च करण्यापेक्षा समाजोपयोगी उपक्रम राबविणे अधिक महत्त्वाचे आहे. आ. सुरेश धस यांनी गोरगरिबांना मोफत उपचार उपलब्ध करून देण्यासाठी आयोजित केलेले हे महाआरोग्य शिबिर



समाजासाठी प्रेरणादायी आणि विधायक उपक्रम आहे, असे गौरवोद्गार काढले.

यावेळी त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, धर्मादाय मदत कक्ष, आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जनआरोग्य योजना यांच्या माध्यमातून लाखो रुग्णांना मोफत उपचार मिळत असल्याचे सांगितले. तसेच आष्टी परिसरातील नागरिकांच्या आरोग्य सुविधांचा विचार करून आष्टी येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी बोलताना आ. सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाल्याचे सांगितले. अधिक रुग्णालयांचा समावेश आणि विविध आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक मदत उपलब्ध झाल्याने हजारो रुग्णांना जीवनदान मिळाले आहे. आमच्या शिफारशीवर अनेक रुग्णांच्या उपचारासाठी लाखो रुपयांची मदत मंजूर झाली असून गोरगरिबांना मोठा दिलासा मिळाला आहे, असे त्यांनी नमूद केले.

आ. धस यांनी १९९९ पासून देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतच्या आपल्या राजकीय प्रवासाचा उल्लेख करत, अमृता फडणवीस या केवळ मुख्यमंत्र्यांच्या पत्नी नसून सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेणाऱ्या संवेदनशील व्यक्तिमत्त्व आहेत, असे सांगितले. तसेच आष्टी येथे वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

समारोपप्रसंगी ज्येष्ठ नेत्रतज्ज्ञ डॉ. तात्याराव लहाने यांनी आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करत मुलांना मोबाईलच्या अतिरेकी वापरापासून दूर ठेवण्याचे आवाहन केले. नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा स्वीकार केल्यास अनेक आजारांपासून बचाव होऊ शकतो, असा संदेश त्यांनी उपस्थितांना दिला.

या कार्यक्रमास मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक, डॉ. रितेश पाटील, प्राजक्ता धस, विविध संत-महंत, वैद्यकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते तसेच हजारो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाआरोग्य शिबिरासाठी आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील ४५ हजारांहून अधिक रुग्णांनी नोंदणी केली होती. पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि बीड येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक उपचार केले. गंभीर आजार असलेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी मोठ्या रुग्णालयात दाखल करण्यात येणार असून आवश्यक शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत.

दिवसभर आष्टी शहरात नागरिकांची मोठी गर्दी उसळली होती. शिस्तबद्ध नियोजन, विविध आरोग्य तपासण्या, तज्ज्ञ डॉक्टरांची उपस्थिती आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे हे महाआरोग्य शिबिर केवळ आरोग्यसेवेचा उपक्रम न राहता समाजसेवेचा आदर्श ठरले. तब्बल ६५ हजार नागरिकांच्या ऐतिहासिक उपस्थितीने या महाआरोग्य शिबिराने आष्टीच्या इतिहासात एक नवा विक्रम नोंदविला.

# परळीच्या शासकीय आयटीआय मध्ये स्पॉट डमिशनसाठी ७९ जागा रिक्त

## प्रवेशासाठी प्राचार्य लोखंडे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

परळी ।प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथ मुंडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ येथे २०२६ च्या शैक्षणिक वर्षासाठी समुपदेशन फेरी अंतर्गत स्पॉट डमिशन प्रक्रिया घेण्यात येणार आहे. संस्थेचे माननीय प्राचार्य संतोषजी लोखंडे यांनी अद्याप प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

प्रवेशा अंतर्गत होणाऱ्या या विशेष फेरीमध्ये विविध ट्रेडमधील एकूण रिक्त जागांवर तात्काळ प्रवेश दिला जाणार आहे.ट्रेडनुसार रिक्त जागा १. इलेक्ट्रिशियन - ०३ जागा २. वायरमन- ०२ जागा ३. वायरमन - ०४ जागा ४. फिटर - ०२ जागा ५. फिटर - ०७ जागा ६. वेल्डर - ०८ जागा ७. वेल्डर - ०९ जागा ८. पत्रेकारागीर - १६ जागा ९. पत्रेकारागीर - १६ जागा १०. कॉम्प्युटर हार्डवेअर - ०८ जागा ११. ड्रेस मेकिंग - ०४ जागा .

यामध्ये विद्यार्थ्यांना उद्योगात प्रशिक्षणासोबत स्टायपंड देखील मिळते. महत्त्वाच्या तारखा, - नवीन अर्जाची शेवटची तारीख: ०७ ऑगस्ट २०२६ - हजेरी नोंदणी: ०९ ऑगस्ट किंवा १० ऑगस्ट २०२६ - ITI नुसार मेरिट यादी: ११ ऑगस्ट २०२६ - प्रत्यक्ष संस्थेत हजर राहून प्रवेश: १२ व १३ ऑगस्ट २०२६ कौशल्याधारित शिक्षण घेऊन रोजगारक्षम होण्यासाठी ही सुवर्णसंधी आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी सर्व मूळ कागदपत्रे - १०वी गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, जात प्रमाणपत्र, आधार कार्ड व पासपोर्ट फोटो व आवश्यक असलेली फी घेऊन निश्चित तारखेला संस्थेत उपस्थित रहावे.अधिक माहितीसाठी विद्यार्थी व पालकांनी लोकनेते गोपीनाथ मुंडे शासकीय खढख, परळी वैजनाथ येथे संपर्क साधावा.लोकनेते गोपीनाथ मुंडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ येथे २०२६ च्या शैक्षणिक वर्षासाठी समुपदेशन फेरी अंतर्गत स्पॉट डमिशन प्रक्रिया घेण्यात येणार आहे.

# शिक्षणमहर्षी,महाराष्ट्र भूषण,माजी आ.भीमराव धोंडे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

### हार-तुरे न घेता केवळ शुभेच्छांचा स्वीकार

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शिक्षणमहर्षी, महाराष्ट्र भूषण, शेतकरी नेते व लोकनेते माजी आ. भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टीसह संपूर्ण मतदारसंघातून शुभेच्छांचा वर्षाव झाला. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दिवंगत नेते अजितदादा पवार यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी वाढदिवसानिमित्त हार-तुरे स्वीकारण्यास नकार देत केवळ शुभेच्छांचा स्वीकार केला. त्यांच्या या संवेदनशील भूमिकेचे उपस्थितांनी स्वागत केले.



आष्टी विधानसभा मतदारसंघाचे सलग चार वेळा प्रतिनिधित्व केलेले माजी आ. भीमराव धोंडे हे शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ तसेच किसान चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थांचे प्रमुख असून शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानामुळे त्यांना शिक्षणमहर्षी म्हणून ओळखले जाते. त्यांच्या वाढदिवसानिमित्त मतदारसंघातील हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी, हितचिंतक आणि सर्वसामान्य नागरिकांनी प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

सकाळी आठ वाजल्यापासूनच कडा येथील बाबाजी महाविद्यालय परिसरात शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या विविध महाविद्यालयांमध्ये वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्या स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. याचबरोबर शाहू-फुले-आंबेडकर कृषी महाविद्यालय तसेच कडा येथील बाबाजी महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस सेवा आणि समाजोपयोगी उपक्रमांद्वारे साजरा करण्याचा संदेश या उपक्रमांतून देण्यात आला.

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अनेक इच्छुक उमेदवारांनीही माजी आ. भीमराव धोंडे यांची भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धोंडे यांच्यावरील आपला विश्वास आणि प्रेम व्यक्त केले.

यावेळी आ. सुरेश धस, माजी आ. बाळासाहेब आजबे, माजी आ. राम सातपुते, माजी आ. साहेबराव दरेकर, महंत विठ्ठल महाराज गहिनीनाथकर, ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल, ह.भ.प. रामकृष्ण रंधवे बापू, ह.भ.प. राधाताई सानप महाराज, रामराव खेडकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, सतीश आबा शिंदे, सदाशिव तुपे, पांडुरंग गावडे, हरिभाऊ जंजिरे, सुदाम जिंजुर्के, तानाजी जंजिरे, सिताराम पोकळे, माजी सभापती सौ. सुवर्णाताई लांबरुड, साहेबराव मस्के, नियामत बेग, बाळासाहेब शिंदे, अशोक साळवे, ड. रत्नदीप निकाळजे, सुनील दादा नाथ, बाळासाहेब भुकन, सरपंच सावता ससाणे, उत्तम बोडखे, शेख अन्सारभाई, बबन नन्नवरे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्रशासन अधिकारी डी. बी. राऊत यांच्यासह सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून तसेच दूरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या.

दिवसभर शुभेच्छा देण्यासाठी नागरिकांची रीघ लागलेली होती. हार-तुरे न स्वीकारता केवळ शुभेच्छांचा स्वीकार करण्याच्या निर्णयामुळे माजी आ. भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसाला साधेपणा, संवेदनशीलता आणि सामाजिक जाणिवेची विशेष छटा लाभल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# माजी आ.भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भगवान महाविद्यालयात पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा उत्साहात संपन्न

### भारतीय शेतीवरील संशोधनाधारित सादरीकरणांनी वेधले लक्ष;७५ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आ. भीमरावजी धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भगवान महाविद्यालय, आष्टी येथे विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला चालना देणारी पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान, आरोग्य आणि शेतीसारख्या महत्त्वाच्या विषयांवर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक व माहितीपूर्ण पोस्टरमुळे स्पर्धेला विशेष रंगत आली.

महाविद्यालयातील प्राणिशास्त्र व रसायनशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत आर्टिफिशियल इंटेलिजन्स व्हर्सेस ह्यूमन इंटेलिजन्स, इफेक्ट ऑफ स्क्रीन टाइम ऑन मेंटल हेल्थ, वर्ल्ड विदाऊट कॅन्सर आणि इम्पॅक्ट ऑफ एआय ऑन इंडियन ग्रीकल्चर या समकालीन विषयांचा समावेश करण्यात आला होता.

स्पर्धेचे उद्घाटन युवा नेते अभय राजे धोंडे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांच्या हस्ते सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी आधुनिक काळातील विविध आव्हाने आणि त्यावरील उपाययोजनांचा



अभ्यासपूर्ण आढावा आपल्या पोस्टर सादरीकरणातून मांडला. या स्पर्धेत आष्टी व परिसरातील विविध महाविद्यालयांतील ७५ संशोधक वृत्तीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रत्येक स्पर्धकाने निवडलेल्या विषयावर माहितीपूर्ण, आकर्षक आणि संशोधनाधारित पोस्टर तयार करून परीक्षक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांसमोर प्रभावी सादरीकरण केले.

स्पर्धकांची संख्या आणि सादरीकरणांचा दर्जा उत्कृष्ट असल्याने परीक्षकांनाही विजेत्यांची निवड करताना मोठी कसरत करावी लागली. स्पर्धेचे परीक्षक म्हणून अन्नतंत्र महाविद्यालय, आष्टीचे प्राचार्य डॉ. एस. एस. मोहोळकर तसेच महेश अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, आष्टीचे डॉ. सी. डी. राऊत यांनी जबाबदारी पार पाडली.

स्पर्धेतील प्रथम क्रमांक सागर भक्ते, अजित कुमार यादव, कु. अक्षता लोळगे, कु. संजना दोषी आणि कु. दीप्ती नेटके यांनी विभागून मिळविला. द्वितीय क्रमांक कु. मेहेक शेख, कु. सानिया शेख, कु. साक्षी कर्डिले आणि कु. पूजा बोराटे यांनी विभागून पटकाविला. तृतीय क्रमांक कु. कीर्ती ढेकळे, कु. रवीना जाधव, कु. कार्तिकी काळे, कु. श्रद्धा पवार आणि कु. शुभांगी पालवे यांनी विभागून मिळविला. तर उत्तेजनार्थ कु. कीर्ती शेंडगे, कु. मसीरा शेख तसेच बांगर एल. बी., गायकवाड पी. व्ही. आणि पवार व्ही. ए. यांना गौरविण्यात आले. स्पर्धेतील सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भीमरावजी धोंडे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेचे यशस्वी नियोजन प्रा. डॉ. दिगंबर पाटील, प्रा. श्रीकांत धोंडे आणि प्रा. डॉ. बाबासाहेब झिने यांनी केले. स्पर्धेच्या आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती, सादरीकरण कौशल्य आणि नाविन्यपूर्ण विचारांना प्रोत्साहन देणारी ही स्पर्धा अत्यंत यशस्वी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# शिक्षणमहर्षी माजी आ.भीमरावजी धोंडे साहेबांच्या वाढदिवसानिमित्त

## पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाचा स्तुत्य उपक्रम

### विद्यार्थ्यांना मिळणार शुद्ध,स्वच्छ व थंड पिण्याचे पाणी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी शहरातील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करत एक अनुकरणीय आणि समाजोपयोगी उपक्रम राबविला आहे. आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे माजी आमदार, शिक्षणमहर्षी तथा महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित मा. भीमरावजी धोंडे साहेबांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी सुमारे ७० हजार रुपये खर्च करून अत्याधुनिक वॉटर प्युरिफायर व वॉटर कूलर यंत्रणा बसविण्यात आली आहे. या सुविधेमुळे आता विद्यालयातील शेकडो विद्यार्थ्यांना वर्षभर शुद्ध, स्वच्छ व थंड पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

सध्याच्या बदलत्या वातावरणात आणि वाढत्या तापमानामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन विद्यालय प्रशासनाने हा निर्णय घेतला. दूषित पाण्यामुळे होणारे विविध आजार टाळण्यासाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन विद्यालयाने विद्यार्थ्यांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देत आधुनिक तंत्रज्ञानयुक्त वॉटर प्युरिफायर आणि वॉटर कूलरची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना कोणत्याही ऋतूमध्ये सुरक्षित व थंड पिण्याचे पाणी सहज उपलब्ध होणार आहे.

माजी आमदार तथा शिक्षणमहर्षी भीमरावजी धोंडे यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात शिक्षण क्षेत्राला दिलेले योगदान आणि





ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी केलेले कार्य सर्वश्रुत आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ औपचारिक शुभेच्छांपुरता कार्यक्रम न ठेवता विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनात उपयुक्त ठरेल असा कायमस्वरूपी उपक्रम राबविण्याचा निर्णय विद्यालयाने घेतला. त्यामुळे हा वाढदिवस समाजोपयोगी कार्यातून साजरा करण्याचा आदर्श संदेशही या माध्यमातून देण्यात आला आहे.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य सुरेश बोडखे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रत्येक शैक्षणिक संस्थेची जबाबदारी आहे. शिक्षणमहर्षी भीमरावजी धोंडे साहेबांच्या कार्यातून प्रेरणा घेत आम्ही विद्यार्थ्यांसाठी कायमस्वरूपी उपयोगी पडणारी ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहिल्यास त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेतही निश्चितच वाढ होईल.

विद्यालयातील शिक्षकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत विद्यार्थ्यांच्या हितासाठी घेतलेला हा निर्णय कौतुकास्पद असल्याचे मत व्यक्त केले. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यालयाच्या सामाजिक बांधिलकीचे हे उत्तम उदाहरण असल्याचे सांगितले, तर पालकांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून केलेल्या या सुविधेबद्दल समाधान व्यक्त करत विद्यालय प्रशासनाचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांमध्येही या सुविधेमुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विशेषतः उन्हाळ्याच्या दिवसांत थंड व शुद्ध पाणी उपलब्ध होणार असल्याने ही सुविधा त्यांच्यासाठी मोठा दिलासा ठरणार आहे. यापूर्वी पाणी साठविणे किंवा घरून पाण्याच्या बाटल्या आणण्याची वेळ येत होती; मात्र आता विद्यालयातच सुरक्षित पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांची मोठी सोय झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि सामाजिक उपक्रम सातत्याने राबविणाऱ्या पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाने या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या आरोग्यालाही तितकेच महत्त्व दिले असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे. शिक्षणासोबतच मूलभूत सुविधांची उपलब्धता ही दर्जेदार शिक्षण व्यवस्थेची ओळख असते. त्या दृष्टीने हा उपक्रम निश्चितच इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरणारा असून समाजोपयोगी कार्यातून वाढदिवस साजरा करण्याचा आदर्श संदेश देणारा आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक, पालक आणि शिक्षणप्रेमींकडून विद्यालयाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# गांधी महाविद्यालय कडा येथे

## पत्रकारिता पदविका अभ्यासक्रमास विद्यापीठाची मान्यता

ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, कडा संचलित श्रीमती एस. के. गांधी कला, अमोलक विज्ञान आणि पी. एच. गांधी वाणिज्य महाविद्यालय, कडा येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्राला वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका शिक्षणक्रमास नुकतीच विद्यापीठाची मान्यता प्राप्त झाली आहे. या मान्यतेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पत्रकारिता क्षेत्रात शिक्षण घेण्यासाठी स्थानिक पातळीवरच दर्जेदार संधी उपलब्ध झाली असून विद्यार्थी व पालकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्रामार्फत सध्या एकूण १९ विविध शिक्षणक्रम राबविण्यात येत असून महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांतील विद्यार्थी या अभ्यासक्रमांना प्रवेश घेत आहेत. विद्यापीठाच्या ज्ञानगंगा घरोघरी या ब्रीदवाक्यानुसार हे अभ्यासकेंद्र सातत्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण देत असून नव्याने मंजूर झालेला पत्रकारिता पदविका अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा वृत्तपत्रिका प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण, पूर्वतयारी शिक्षणक्रम उत्तीर्ण, इयत्ता बारावी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण, १९७५ पूर्वीची अकरावी (माध्यमिक शालांत) परीक्षा उत्तीर्ण किंवा एसएससीनंतर शासनमान्य किमान दोन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम




पूर्ण केलेला असणे आवश्यक आहे.

या अभ्यासक्रमासाठी ६० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता निश्चित करण्यात आली असून इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी लवकरात लवकर अर्ज करावा, असे आवाहन महाविद्यालय प्रशासनाने केले आहे.

या अभ्यासकेंद्राच्या यशस्वी वाटचालीसाठी संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष तसेच संचालक मंडळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत असल्याचे सांगण्यात आले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जवाहरलाल भंडारी आणि अभ्यासकेंद्राचे केंद्रसंयोजक प्रा. डॉ. अशोक कोरडे यांच्या अथक प्रयत्नांमुळे हा अभ्यासक्रम सुरू होणे शक्य झाले असल्याचे महाविद्यालयाने नमूद केले आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पत्रकारिता आणि जनसंज्ञापन क्षेत्रात शिक्षणाची नवी दिशा देणारा हा अभ्यासक्रम निश्चितच उपयुक्त ठरणार असून भविष्यात माध्यम क्षेत्रात करिअर घडविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही मोठी संधी मानली जात आहे.अधिक माहितीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी केंद्रसंयोजक प्रा. डॉ. अशोक कोरडे तसेच तंत्र सहाय्यक ज्ञानेश्वर खंदारे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कडा येथे क्रीडा महोत्सवाचे उत्साहात उद्घाटन; धोंडे प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

## विद्यार्थ्यांनी जागतिक दर्जाच्या खेळाडूंचा आदर्श ठेवून सातत्याने स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे-माजी आ.भीमराव धोंडे

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आनंद चॅरिटेबल शिक्षण संस्था व इतर संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भव्य क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. याच कार्यक्रमात दोन दिवसांपूर्वी पार पडलेल्या धोंडे प्रीमियर लीग (डीपीएल) क्रिकेट स्पर्धेच्या विजेत्या संघांना बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे म्हणाले की, खेळामध्ये यश संपादन करायचे असेल तर विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर विक्रम करणाऱ्या खेळाडूंचा आदर्श समोर ठेवून सातत्याने मेहनत घेतली पाहिजे. वारंवार विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी झाल्यास अनुभव वाढतो, आत्मविश्वास निर्माण होतो आणि यशाचा मार्ग अधिक सुकर होतो.

ते पुढे म्हणाले की, ग्रामीण भागातही उत्कृष्ट खेळाडू घडविण्याची मोठी क्षमता आहे. क्रीडा महोत्सवासारख्या उपक्रमांमधून ग्रामीण विद्यार्थ्यांना आपली प्रतिभा सादर करण्याची संधी मिळते. राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये यश मिळविल्यास विविध शासकीय विभागांमध्ये क्रीडा कोट्यातून नोकरीच्या मोठ्या संधी उपलब्ध होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आतापासूनच आपल्या करिअरचे ध्येय निश्चित करून त्यादृष्टीने नियोजनबद्ध तयारी करावी. पालकांनीही मुला-मुलींना सकस आहार, योग्य प्रशिक्षण व प्रोत्साहन देऊन त्यांच्या गुणवत्तेला चालना द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

क्रीडा महोत्सवात आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यातील विविध शैक्षणिक संस्थांमधील हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते. महोत्सवाच्या प्रारंभी कडा शहरातून क्रीडा ज्योतीची भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीने संपूर्ण परिसरात क्रीडाप्रेम व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार भीमराव धोंडे होते. व्यासपीठावर सौ. दमयंतीताई धोंडे, महेश कारखान्याचे चेअरमन अजयदादा धोंडे, युवा नेते अभयराजे धोंडे, सौ. पायलताई धोंडे, सौ. सविताताई धोंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, महेश कारखान्याचे



व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप, चेअरमन राजेश धोंडे, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती नामदेव धोंडे, रामराव खेडकर, राजाबापू नलावडे, नानाभाऊ वाडेकर, हरिभाऊ जंजिरे, महेश कारखान्याचे संचालक बजरंग कर्डिले, अंकुश मुंढे, पांडुरंग गावडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांनी सांगितले की, माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात रक्तदान शिबिर, क्रीडा महोत्सव तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या क्रीडा, कला व नेतृत्व गुणांना व्यासपीठ मिळावे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

याच निमित्ताने महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरालाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमास महेश कारखान्याचे संचालक विधाते, बाबा वाघुले, सरपंच सावता ससाने, विठ्ठल लांडगे, मधुकर शिरोळे, राजू रासकर, बाळासाहेब भुकन, सुदाम झिंजुर्के, बाळासाहेब शिंदे, बाळासाहेब पवार, नानाभाऊ वाडेकर, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य डॉ. एस. एन. वाघुले, लिंबराज कर्डिले, सोनाजी गांजुरे, सरपंच माऊली वाघ, रामकिशन बुचुडे, बाबा ससाने, सरपंच सोमनाथ गायकवाड, प्रा. डॉ. बाळासाहेब धोंडे, माजी सभापती अनिल जायभाय, चेअरमन डॉ. शाम सांगळे, चेअरमन दादासाहेब हजारे, सेवानिवृत्त पीएसआय शेख यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य बापू खैरे व प्रा. विनोद ढोबळे यांनी केले. उपस्थित विद्यार्थी, शिक्षक, कार्यकर्ते व मान्यवरांनी माजी आमदार भीमराव धोंडे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील योगदानाचा गौरव केला. तसेच धोंडे प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते चषक, सन्मानचिन्हे व बक्षिसांचे वितरण करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आणि मोठ्या प्रतिसादात संपन्न झाला.

---

## भगवान महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती

# लोकमान्य टिळक पुण्यतिथी लेखन प्रेरणा दिन म्हणून उत्साहात साजरी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टी संचलित भगवान महाविद्यालय, आष्टी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी लेखन प्रेरणा दिन म्हणून शनिवार, दि. १ ऑगस्ट रोजी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये वाचन, लेखन आणि राष्ट्रप्रेमाची प्रेरणा जागविण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून प्राचार्य डॉ. वाघ यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी दोन्ही महान विभूतींच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा आदर्श विद्यार्थ्यांनी जीवनात अंगीकारावा, असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. वाघ यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी साहित्य, समाजप्रबोधन आणि सामाजिक समतेसाठी दिलेल्या अतुलनीय योगदानाचा आढावा घेतला. त्यांनी अण्णाभाऊंच्या साहित्याने वंचित समाजाला नवी दिशा दिली असून त्यांच्या लेखनातून समता, स्वाभिमान आणि सामाजिक न्यायाचा संदेश मिळतो, असे सांगितले.

तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील मोलाच्या कार्याचा उल्लेख करत त्यांनी शिक्षण, राष्ट्रप्रेम, स्वाभिमान आणि समाजजागृतीसाठी केलेले योगदान विद्यार्थ्यांसमोर उलगडून सांगितले. लेखन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय जोपासावी, लेखनातून आपल्या विचारांना अभिव्यक्त करावे आणि ज्ञानसंपन्न, संस्कारक्षम व्यक्तिमत्त्व



घडवावे, असे आवाहनही त्यांनी केले.यावेळी उपप्राचार्य डॉ. टाळके यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा सामाजिक परिवर्तनामध्ये असलेला प्रभाव अधोरेखित केला, तर डॉ. वैद्य यांनी लोकमान्य टिळक यांच्या विचारांचे आजच्या काळातील महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांनी त्यांच्या राष्ट्रनिष्ठेचा आदर्श घ्यावा, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासण्याचा आणि नियमित लेखन करण्याचा संकल्प व्यक्त केला. उपस्थित विद्यार्थ्यांनी महान विभूतींच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजहिताची जाणीव जपण्याचा निर्धार व्यक्त केला.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गाडे यांनी केले, तर प्रा. शेख यांनी उपस्थितांचे आभार मानले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

---

# सतीश घाटगे यांच्या पाठपुराव्याला यश

घनसावंगी प्रतिनिधी

चित्रवडगाव शिवारातील गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला पांदण रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन तथा घनसावंगी विधानसभा निवडणूक प्रमुख सतीश घाटगे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तालुका प्रशासनाने तातडीने कारवाई करत हा रस्ता मोकळा करून दिला.

चित्रवडगावातील शेतकरी आणि ग्रामस्थांसाठी पांदण रस्ता हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न बनला होता.रस्ता बंद असल्याने शेतकऱ्यांना शेतात ये-जा करण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.या समस्येच्या निराकरणासाठी गेल्या सहा महिन्यांपासून तुकाराम सोसे, श्रीमंत बप्पा पोकळे,सरपंच गजानन सोसे,बबनराव उघडे



यांच्यासह स्थानिक शेतकरी बांधवांनी सतीश घाटगे यांच्या माध्यमातून प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला.

या प्रश्नाची गंभीर दखल घेत सतीश घाटगे यांनी संबंधित महसूल प्रशासनाशी सातत्याने संपर्क ठेवत रस्ता मोकळा करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळत घनसावंगीचे तहसीलदार रमेश पागोटे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली आणि आवश्यक कार्यवाही करून पांदण रस्ता मोकळा करून दिला.

तहसीलदार रमेश पागोटे यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे शेतकऱ्यांची अनेक वर्षांची अडचण दूर झाली असून गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.गावकऱ्यांची समस्या समजून घेऊन तत्काळ निर्णय घेतल्याबद्दल तहसीलदार रमेश पागोटे यांचे तसेच या प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे सतीश घाटगे यांचे चित्रवडगावातील शेतकरी व ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले आहेत.

---

# सुनेत्रा पवारांवरील वक्तव्याचा भोकरदनमध्ये तीव्र निषेध

भोकरदन इसरारखान पठाण

महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा अजित पवार यांच्याबाबत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केल्याचा आरोप असलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट च्या वतीने बुधवारी भोकरदन येथे जोरदार आंदोलन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौकात कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला.त्यानंतर तहसीलदारांना निवेदन देऊन संबंधितांवर कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली.राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या निवेदनात लोकशाही व्यवस्थेत वैचारिक मतभेद असू शकतात मात्र महिला लोकप्रतिनिधींविषयी आक्षेपार्ह भाषा वापरणे निषेधार्ह असून त्यामुळे समाजात चुकीचा संदेश जातो आणि राजकीय संस्कृतीला धक्का पोहोचतो असे नमूद करण्यात आले आहे.

सुनेत्रा पवार या राज्याच्या उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रीय पक्षाच्या अध्यक्षा असल्याने त्यांच्याविषयी करण्यात आलेले कथित वक्तव्य हे महिला सन्मानालाच धक्का देणारे




राष्ट्रवादी काँग्रेसचे आंदोलन घोषणाबाजी करत तहसीलदारांना निवेदन कारवाईची मागणी

असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला. संबंधित वक्तव्याबाबत काँग्रेसने जाहीर माफी मागावी तसेच प्रकरणाची दखल घेऊन संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली. भविष्यात अशा प्रकारच्या वक्तव्यांना आळा घालण्यासाठी शासनाने प्रभावी उपाययोजना कराव्यात असेही निवेदनात म्हटले आहे.

या आंदोलनात माजी सभापती लक्ष्मणराव पाटील दळवी,जिल्हा उपाध्यक्ष मदनराव तुपे,तालुकाध्यक्ष सुरेश सपाटे,केशव जंजाळ, शामराव दांडगे,समद शेख, सुनील साबळे,जनार्दन सोळुंके, प्रमोद सुरडकर, शंकर भुजाडे,सलीमभाई, गजेंद्र लोखंडे,शेख जाकीर, शेख नजीर,नवाज बेग मिर्झा यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

---

# तक्रारींकडे दुर्लक्षाचा आरोप नागरिकाची उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांकडे धाव

## एफआयआर नोंदवून नव्याने निष्पक्ष चौकशीची मागणी तहसील कार्यालयातील कथित गैरवर्तनावर गंभीर आरोप

भोकरदन इसरारखान पठाण

भोकरदन तालुक्यातील हसनाबाद येथील नागरिक एकनाथ सरजेराव करतारे यांनी आपल्या तक्रारींची योग्य दखल घेतली जात नसल्याचा आरोप करत उपविभागीय पोलिस अधिकारी भोकरदन यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे. दि.१ ऑगस्ट २०२६ रोजी दिलेल्या निवेदनात त्यांनी यापूर्वी दाखल केलेल्या दोन तक्रारींच्या चौकशीवर आक्षेप घेत संबंधित अहवाल रद्द करून नव्याने निष्पक्ष तपास करावा तसेच एफआयआर नोंदविण्याची मागणी केली आहे.निवेदनानुसार, दि. ८ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी सुमारे १०.४० वाजता अर्जाच्या संदर्भात चौकशी करण्यासाठी तहसील कार्यालयात गेले असता तालुका दंडाधिकारी संतोष बनकर यांनी त्यांच्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे.



पाण्याची बाटली फेकण्याचा तसेच कागदपत्रे फेकून दमदाटी केल्याचा दावा करतारे यांनी केला आहे.

याप्रकरणी तक्रार देण्यासाठी ते भोकरदन पोलिस ठाण्यात गेले असता लेखी तक्रार स्वीकारण्यात आली नाही आणि दीर्घकाळ कोणतीही प्रभावी चौकशी झाली नसल्याचा आरोपही त्यांनी निवेदनात केला आहे.

तसेच दि. २४ जून २०२६ रोजी तहसील कार्यालयाच्या आदेशानुसार दोन शिपाई व एका अधिकाऱ्याने त्यांना कार्यालयाबाहेर काढून धमकी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे.या प्रकरणाच्या चौकशीदरम्यान सीसीटीव्ही फुटेज तपासले गेले नाही साक्षीदारांचे जबाब नोंदवले गेले नाहीत आणि अपूर्ण माहितीच्या आधारे अहवाल तयार करून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.निवेदनात पी.आय. बांगर यांनी सादर केलेला चौकशी अहवाल रद्द करून नव्याने निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच संबंधित घटनेप्रकरणी भारतीय न्याय संहिता बीएनएस मधील कलम १३२, ११५(२), १८९(२), ३(६) व १६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

याशिवाय २४ जून २०२६ रोजीच्या घटनेचे तहसील कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेऊन साक्षीदारांचे जबाब नोंदवावेत तसेच २०१२ पासून एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांमुळे चौकशीत निष्पक्षता राहत नसल्याचा आरोप करत संबंधित अधिकाऱ्यांच्या बदलीचीही मागणी करण्यात आली आहे.

करतारे यांनी निवेदनात २१ डिसेंबर २०२३ रोजी दिलेल्या अर्जावर अद्याप कार्यवाही न झाल्याचे १५ जून २०२६ रोजी मिळालेल्या नोटिशीबाबतही आक्षेप नोंदवला आहे. तसेच माहिती अधिकार कायदा २००५ अंतर्गत १३ जानेवारी २०२६ रोजी मागविलेल्या माहितीला अद्याप उत्तर मिळाले नसल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

---

# जनतेच्या प्रश्नांवर काँग्रेसची रणशिंग फुंकली रघुपती राघव राजाराम आंदोलनाची घोषणा

कर्जमाफी लाडकी बहीण नीट पेपरफुटी पीककर्जासह लोकहिताच्या प्रश्नांवर सरकारला घेरणार तालुका आढावा बैठकीत रणनीती निश्चित

जालना शेख फारुक

राज्यातील शेतकरी विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत आगामी रघुपती राघव राजाराम आंदोलनाची रणशिंग फुंकली आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार जालना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने बुधवारी दि. ५ मा.खासदार डॉ.कल्याण काळे यांच्या संपर्क कार्यालयात झालेल्या जालना तालुका काँग्रेसच्या आढावा बैठकीत आंदोलनाची रणनीती निश्चित करण्यात आली.बैठकीला जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे,माजी आमदार राजेश राठोड,प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, बदरभाई चाऊस,माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

बैठकीत शेतकरी कर्जमाफीच्या यादीतील त्रुटी लाडकी बहीण योजनेतील अपात्र लाभार्थी नीट-यूजी पेपरफुटी प्रकरण शेतकऱ्यांना पीककर्ज वितरणातील अडथळे तसेच जालना जिल्ह्यातील विविध प्रलंबित लोकहिताच्या प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधण्यासाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना गावपातळीपर्यंत संघटन अधिक मजबूत करण्याचे आवाहन करण्यात आले.प्रत्येक गावात जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्ष उभारून आगामी रघुपती राघव राजाराम आंदोलन यशस्वी करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बैठकीस कृष्णा पडूळ, ज्ञानेश्वर डुकरे,अशोकराव उबाळे,नारायण वाडेकर, सोपान तिरुखे,ज्ञानेश्वर इंगोले, सुरेश कदम,नारायण काका शिंदे,गणेश खरात,फकिराव मोहिते,सर्जेराव



पटेकर,लाला पाटील लकडे,विक्रम चव्हाण, सुधाकर ढोकळे,बाळू वाहुळे, काकासाहेब गवारे,देविदास चव्हाण यांच्यासह तालुक्यातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.बैठकीनंतर उपस्थितांनी जनतेच्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला.

---

# २४ वर्षे २१ दिवस देशसेवा बजावून ज्ञानेश्वर पाटील बदर सेवानिवृत्त

रत्नमाला लॉन्स येथे सेवापूर्ती सोहळा उत्साहात देशहित व समाजसेवेसाठी आयुष्य समर्पित करण्याचा निर्धार

पराडा गणेश पाटोळे :- भोकरदन तालुक्यातील वालसा येथील भूमिपुत्र ज्ञानेश्वर दौलतराव पाटील बदर यांनी भारतीय सेनेत तब्बल २४ वर्षे २१ दिवस देशसेवेचे पवित्र कर्तव्य प्रामाणिकपणे आणि निष्ठेने पार पाडल्यानंतर सेवानिवृत्ती स्वीकारली.त्यांच्या सेवापूर्ती व सेवानिवृत्ती निमित्त आयोजित सत्कार सोहळा भोकरदन येथील रत्नमाला लॉन्स येथे मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात पार पडला.या सोहळ्यास जिल्हा परिषद सदस्य गणेश बापू फुके,जिल्हा परिषद सदस्य डॉ.साबळे, लासलगाव बाजार समितीचे सदस्य,पत्रकार, गणेश मामा पाटोळे,गावचे सरपंच,उपसरपंच,शिक्षक, ग्रामस्थ,नातेवाईक तसेच माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना ज्ञानेश्वर बदर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की लहानपणापासून भारतीय सेनेत भरती होऊन देशसेवा करण्याचे स्वप्न होते. आई-वडील,बंधू आणि कुटुंबीयांनी दिलेल्या पाठबळामुळे हे स्वप्न साकार झाले.भारतीय सेनेत भारतमातेची सेवा करण्याची संधी लाभणे हे माझे परमभाग्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी सैन्यातील २४ वर्षे २१ दिवसांच्या सेवाकाळातील अनुभव उपस्थितांसमोर मांडले. यापुढील आयुष्य देशहित, समाजसेवा तसेच आई-वडिलांच्या सेवेसाठी समर्पित करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या शेवटी सेवापूर्ती




सोहळ्यास उपस्थित राहून शुभेच्छा दिलेल्या सर्व मान्यवर ग्रामस्थ,मित्रपरिवार व नातेवाईकांचे ज्ञानेश्वर बदर यांनी मनःपूर्वक आभार मानले.उपस्थितांनी त्यांच्या देशसेवेबद्दल गौरव करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# राज्यमंत्री ॲड.आशीष जयस्वाल यांच्या उपस्थितीत उद्या बदनापूरात शिवसेना पदाधिकारी संवाद आढावा मेळावा

बदनापूर प्रतिनिधी

शिवसेना जालना जिल्ह्याच्या वतीने बदनापूर विधानसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांचा संवाद व आढावा मेळावा गुरुवार दि.६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शिवसेना जनसंपर्क कार्यालय हायवे रोड बदनापूर येथे आयोजित करण्यात आला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा मेळावा महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

मेळाव्यास महाराष्ट्र शासनाचे राज्यमंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री ड. आशीष जयस्वाल हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असून आमदार अर्जुनभाऊ खोतकर यांचेही मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच युवासेना महाराष्ट्र राज्य सचिव अभिमन्यू खोतकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

यावेळी भास्करराव आंबेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, युवासेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब इंगले, युवासेना लोकसभा अध्यक्ष गणेश मोहिते, संपर्क प्रमुख ए. जे. बोऱ्हाडे पाटील, अल्पसंख्याक संपर्क प्रमुख फिरोजलला तांबोळी, युवासेना जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर, विधानसभा संपर्क प्रमुख कैलास दुधनी यांच्यासह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी आणि विविध आघाड्यांतील जिल्हा व विधानसभा स्तरावरील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

संवाद आढावा मेळाव्यात संघटन अधिक मजबूत करणे पक्षवाढ, बूथ सक्षमीकरण जनसंपर्क अभियानाची प्रभावी अंमलबजावणी तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणनीती यावर सविस्तर चर्चा होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन भालचंद्र भोजने, रावसाहेब पवार,



प्रविण फुके पाटील, रुद्र घुगे, शिवाजीराव जऱ्हाड, महादू गीते, रतनकुमार नाईक, सखाराम क्षीरसागर, अनिल हिवराळे, शिवाजी इंगळे, महेश रायकर, छाया जऱ्हाड, संभाजी गुढे, दीपक शेठ मंत्री, ऋषिकेश थोरात, अंकुश दाभाडे, ऋतुराज कदम, निवृत्ती डाके, राजू थोरात, अमोल दाभाडे, रऊफ पटेल आणि रामेश्वर नागवे यांनी केले आहे.बदनापूर विधानसभा मतदारसंघातील सर्व पदाधिकारी, शिवसैनिक व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मेळावा यशस्वी करावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिक्षणसेवेला भावपूर्ण सलाम मुख्याध्यापक कैलास जाधव यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात

बारसवाडा प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारसवाडा येथील मुख्याध्यापक कैलास गणपतराव जाधव यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित करण्यात आलेला सत्कार सोहळा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला.ग्रामस्थ, विद्यार्थी,शिक्षक व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात जाधव यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक योगदानाचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली.यावेळी अंबड खरेदी-विक्री संघाचे चेअरमन बालासाहेब नरोटे, केंद्रप्रमुख झांबरे सर नालेवाडी,शिक्षण अधिकारी दिनेश सिंगारे अंबड तसेच केंद्रप्रमुख रामेश्वर आवटकर डोंगरगाव यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थिनींच्या आकर्षक लेझीम पथकाने काढलेल्या स्वागत मिरवणुकीने कार्यक्रमाची रंगत वाढविली. खांडे सर यांनी प्रास्ताविक केले तर विद्यार्थिनींनी सादर केलेल्या स्वागतगीताने उपस्थितांची मने जिंकली.



यावेळी राजेश भैय्या टोपे यांच्या हस्ते कैलास जाधव यांचा शाल,श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.तसेच नीट परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविलेल्या जिल्हा परिषद शाळा बारसवाडाचे माजी विद्यार्थी उमेश बाबासाहेब सावंत यांचाही विशेष गौरव करण्यात आला.

कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून जाधव सरांनी दिलेल्या संस्कारांची आणि शैक्षणिक मार्गदर्शनाची कृतज्ञतेने आठवण करून दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राधाकिशन सावंत यांनी केलेल्या नियोजनाचे सर्व स्तरांतून कौतुक झाले. ग्रामस्थांच्या वतीने त्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

शेवटी प्रदर्शन सावंत यांनी आभार मानले. सेवापूर्तीच्या या भावनिक क्षणी अनेक ग्रामस्थ, विद्यार्थी व सहकाऱ्यांचे डोळे पाणावले. जाधव यांच्या शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त करत त्यांना निरोगी, आनंदी आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.




# महान गायक स्व किशोरकुमार जयंती- अंबाजोगाईत संपन्न

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

दि ४ ऑगस्ट २६ रोजी महान गायक स्व. किशोरकुमार यांचा जयंतीनिमित्त आंबगोगाईत स्वयंवर मंगल कार्यालयात किशोर फॅन्सक्लब चे अध्यक्ष मिलिंद मस्के यांनी आयोजन केले. या कार्यक्रमात अंबाजोगाई आणि बाहेरून गायक गायिका उपस्थित राहून सूरसुमनांजली अर्पित करण्यात आली. ४ ऑगस्ट हा स्व. किशोरकुमार यांचा वाढदिवस असल्याने मोठा केक कापून जन्मोत्सव साजरा करण्यात आला.मिलिंद मस्के हे मोठे किशोर दांचे चाहते आहेत. बऱ्याच वर्षापासून ते हा कार्यक्रम आयोजित करतात,या वेळी त्यांनी खूपच मोठ्या प्रमाणात आयोजन केले.यावेळी डॉ राजेश इंगोले,तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, प्रा राजकुमार ठोके,मिलिंद मस्के यांच्यासह मंजुषा देशपांडे, आरती कुलकर्णी, मयुरी मजगे,सुभाष शेप,अभय जोशी, डॉ संदीप जैन,डॉ चामनर, डॉ कस्तुरे,राज माने,दिपक बिडवे,श्रीधर देशपांडे, सचिन चिंतावार,शंकर वावदाने या आणि बऱ्याच गायक- गायिकांनी आपल्या सुरेल गीतांनी प्रेक्षकांची मने जिंकली.कार्यक्रम सूत्रसंचनल परमेश्वर गित्ते यांनी अतिशय बहरदार पणे केले.

# गेवराई बाजार-गोकुळवाडी मार्गावरील २०० मीटर पक्का रस्ता मार्गी भाऊसाहेब घुगे यांच्या हस्ते भूमिपूजन

बदनापूर प्रतिनिधी

गेवराई बाजार ते गोकुळवाडी बदनापूर मार्गावरील गेवराई बाजार गाव हद्दीतील २०० मीटर पक्का रस्ता नाथ फाऊंडेशनच्या माध्यमातून उभारण्यात येणार असून या विकासकामाचे भूमिपूजन शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

या मार्गावरील रस्ता पावसाळ्यात चिखलमय होत असल्याने ग्रामस्थांना पायी चालणे तसेच वाहनांची वाहतूक करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येबाबत ग्रामस्थांनी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर नाथ फाऊंडेशनच्या माध्यमातून २०० मीटर पक्का रस्ता बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. या कामामुळे परिसरातील नागरिकांची गैरसोय दूर होऊन दळणवळण अधिक



सुरक्षित आणि सुलभ होणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

भूमिपूजन कार्यक्रमाला शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे,बदनापूर विधानसभा प्रमुख कैलास दुधानी,युवासेना सचिव अमोल दाभाडे,प्रा.शिवाजी मुळे,युवा तालुका प्रमुख सतीश चव्हाण,दीपक खरात, गेवराई बाजारचे सरपंच कारभारी देवकर,ग्रामपंचायत सदस्य कृष्णा रोडे, सोसायटी सदस्य मिठू पाटील कान्हेरे, सामाजिक कार्यकर्ते विष्णू मोरे,आसाराम सोरमारे, योगेश कान्हेरे,गणेश कान्हेरे, अमोल कान्हेरे,मिठू कान्हेरे, ज्ञानेश्वर कान्हेरे,पांडुरंग कान्हेरे,पत्रकार नारायण बामने,पत्रकार योगेश लहाने, अनिल गाडेकर,रघुनाथ गाडेकर,प्रमुख देवकर,अण्णा आढाव, ज्ञानेश्वर आढाव,कृष्णा गाडेकर, कैलास लहाने,कैलास ब्राह्मणे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा सक्षम करण्यासाठी विकासकामांना प्राधान्य दिले जात असल्याचे सांगितले. या रस्त्याच्या कामामुळे गावाच्या विकासाला चालना मिळणार असून नागरिकांच्या दैनंदिन प्रवासातील अडचणी दूर होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. दरम्यान, ग्रामस्थांनी नाथ फाऊंडेशन व शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांचे आभार व्यक्त केले.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अंतर्गत कलह चव्हाट्यावर, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाणांच्या कार्य पद्धतीवर

# जिल्हा सरचिटणीस डॉ.उत्तम खोडसेंचा गंभीर आक्षेप

केज/प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार गटाचे बीड जिल्हा सरचिटणीस डॉ.उत्तम खोडसे यांनी पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांच्या कारभारावर गंभीर आक्षेप घेत जोरदार निशाणा साधला आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या कठीण काळात पाठ फिरवणारे आणि पक्षाशी निष्ठा नसलेले लोक आज सत्तेच्या लाभासाठी गटा-तटाचे राजकारण करत आहेत असा खळबळजनक आरोप डॉ.उत्तम खोडसे यांनी केला आहे.

काय आहे नेमका वाद?

प्राप्त माहिती नुसार नुकताच केज येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नावाखाली एका विशिष्ट गटाचा बुथ एजंट,कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचा मेळावा व बैठक पार पडली.या कार्यक्रमाचे प्रमुख जिल्हाध्यक्ष राजेश्वरजी चव्हाण हेच होते.मात्र,या कार्यक्रमा बाबत पक्षाच्या कोणत्याही अधिकृत पदाधिकाऱ्यांना किंवा कार्यकर्त्यांना पूर्व कल्पना किंवा निरोप देण्यात आला नव्हता असा आक्रमक पवित्रा डॉ.उत्तम खोडसे यांनी घेतला आहे.दि. २ ऑगस्ट रोजी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या आगमनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ही जिल्हाध्यक्षांनी स्वतः उपस्थित राहून कार्यक्रम अर्धवट सोडल्याने अनेक निष्ठावंत कार्यकर्त्यांची भेट होऊ शकली नाही अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

डॉ.उत्तम खोडसेंचे प्रमुख आरोप व ठळक मुद्दे गटातटाचे राजकारण आणि डावलले जाणे काही मंडळी केवळ राजकीय लाभ आणि स्वतःचे नेतृत्व चमकवण्यासाठी राष्ट्रवादी पक्षात दाखल झाले आहेत.डॉ.उत्तम खोडसे हे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत युसुफ वडगाव मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत,याची पूर्ण जाणीव असताना त्यांना आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांना जाणीव पूर्वक दुर्लक्षित केले जात असल्याचाआरोप त्यांनी केला आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या कठीण काळात हे सगळे गट आणि नेते नेमके कुठे लपले होते? असा संतप्त सवाल करीत डॉ.खोडसे यांनी या मंडळींच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.



निष्ठावंतांना डावलून सगेसोयरे यांचा लाभ

जिल्हाध्यक्ष हेआपल्या पदाचा गैरवापर करून केवळ स्वतःच्या वैयक्तिक सगेसोयरे आणि ते कुठल्याही पक्षात असोत,त्यांना लाभ पोहोचवण्याचे काम करत आहेत. सर्वसामान्य मराठा कार्यकर्त्यांना पद्धतशीरपणे बाजूला सारले जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

पक्षात जातीपातीचे राजकारण

इतर समाजातील कार्यकर्त्याला तालुका उपाध्यक्ष पदावर घेतल्यामुळे जिल्हाध्यक्ष व त्यांच्या काही सहकारीनेत्यांचा 'इगो' दुखावला गेला असून,त्यातूनच हा दुजाभाव सुरू असल्याचा दावा डॉ. खोडसे यांनी केला आहे.

आम्ही कुणाच्या तुकड्यांवर जगणारे नाही!- डॉ.खोडसे

आपल्या भूमिकेबाबत बोलताना डॉ.उत्तम खोडसे म्हणाले की, आम्ही स्वर्गीय अजित दादा आणि माजी मंत्री धनंजयजी मुंडे साहेब यांच्या सर्वसामान्यांना न्याय देण्याच्या धाडसी वृत्तीवर आणि निष्पक्ष कार्यावर विश्वास ठेवून पक्षात प्रवेश केला आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शिव,फुले, आंबेकरांच्या विचार सरणीवर चालणारा आहे,ही कुणाची जहागिरी नाही.आम्ही सुद्धा क्षत्रिय आहोत, लढणे हा आमचा धर्म आहे.आम्ही कुणाच्या तुकड्यांवर जगणारे किंवा केवळ लाभासाठी आलेले नाहीत.या संपूर्ण प्रकाराबाबत आपण पक्षाचे नेते धनंजय मुंडे यांच्याशी चर्चा केली असून,आवश्यकता भासल्यास राज्याचे उपमुख्यमंत्री,राष्ट्रवादी पक्षाचे प्रमुख तसेच बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री आणि इतर वरिष्ठ नेत्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन जिल्ह्यातील संपूर्ण वस्तुस्थिती सविस्तरपणे मांडणार असल्याचा इशाराही त्यांनी शेवटी दिला आहे.

# राष्ट्रीय खाद्यतेल अभियाना अंतर्गत सोयाबीन पीक पद्धतीवर शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन




केज/प्रतिनिधी

बनसारोळा राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबिया सन २०२६ -२७ अंतर्गत पीक पद्धतीवर आधारित सोयाबीन पीक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन बनसारोळा येथील प्राचार्य बाबासाहेब गोरे यांच्या फार्म हाऊसवर करण्यात आले आहे.या प्रशिक्षणामध्ये सोयाबीन पिकाची शास्त्रोक्त पद्धतीने लागवड,सुधारित बियाण्यांची निवड, बीजप्रक्रिया,खत व्यवस्थापन,तण नियंत्रण,कीड व रोग व्यवस्थापन तसेच उत्पादन वाढीसाठी आवश्यक आधुनिक कृषी तंत्रज्ञानाबाबत शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन मंडळ कृषी अधिकारी,युसुफ वडगाव यांच्या मार्गदर्शनाखाली अधिनस्त सहाय्यक कृषी अधिकारी,उप कृषी अधिकारी व मंडळ कृषी अधिकारी यांच्या वतीने करण्यात आले आहे.कार्यक्रमास पद्माई कृषी उत्पादक प्रोड्युसर कंपनी, बनसारोळा यांचे विशेष सौजन्य लाभले होते.सोयाबीनउत्पादक शेतकऱ्यांसाठी हे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोयाबीन ची उत्पादकता व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी मार्गदर्शन मिळणार आहे.त्यामुळे परिसरातील सर्व शेतकरी बांधवांनी या बहुमोल प्रशिक्षणाचा लाभ बनसारोळा




# आजीवन शिक्षण विभागाच्या माध्यमातून युवकांना रोजगाराच्या संधी - डॉ. अश्विन रांजणीकर

माजलगाव ।प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अल्पकालीन कौशल्याधारित अभ्यासक्रमांमुळे युवक-युवतींना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होत असल्याचे प्रतिपादन विभागाचे संचालक डॉ. अश्विन रांजणीकर यांनी केले.

श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित शिबिर उद्घाटन व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी होते. यावेळी अर्थ समितीचे अध्यक्ष एकनाथ जाधव व ग्रंथपाल प्रा. सुरेश बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. रांजणीकर यांनी फार्मसी, ब्युटीशियन, ग्रामीण पत्रकारिता, बालवाडी-अंगणवाडी सेविका, बँकिंग आदी कौशल्याधारित अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विद्यापीठाने आतापर्यंत सुमारे ४० हजार महिला व युवकांना प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविल्याची माहिती दिली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. देवर्षी यांनी विद्यार्थ्यांनी कौशल्यविकासावर भर देत स्वावलंबी होण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक डॉ. कमलकिशोर लड्डा यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सीताराम इंगोले यांनी केले तर आभार ग्रंथपाल प्रा. सुरेश बनसोडे यांनी मानले. या कार्यक्रमास आजीवन शिक्षण विस्तार सेवा विभागाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# ग्रामपंचायत कार्यालय सोनिजवळा येथे शासकीय कामात अपहार,लाखोंचा भ्रष्टाचार,रोगापेक्षा इलाज भयंकर...!

## सखोल चौकशी करून संबंधीतावर कठोर कारवाई करण्याची तक्रारदारांची पत्रकार परिषदेद्वारे शासनाकडे मागणी

केज/प्रतिनिधी

सोनी जवळा ग्रामपंचायत मधील विकास कामामध्ये शासकीय निधीचा गैरवापर झाला असून त्या संबंधीत तक्रारदारांनी घेतलेल्या पत्रकार परिषेदत तक्रारदार बाळासाहेब कोकाटे,व हनुमंत गायकवाड यांनी ही माहिती दिली.ग्रामपंचायत कार्यालय सोनी जवळा तालुका केज येथील सरपंच ग्रामसेवक व ज्यांचे नावे बिले उचलली आहेत यांच्या संगणमताने लाखो रुपयांचा शासकीय निधीचा अपहार करण्यात आला असल्याचे लेखी तक्रार गट विकास अधिकारी, पंचायत समिती केज यांच्याकडे करण्यात आली असून तक्रारदारांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दोषीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

विकास कामात लाखोंचा भ्रष्टाचार

ग्रामपंचायत कार्यालय सोनीजवळा येथे दि.१ जानेवारी २०२३ ते ३० जुन २०२६ या कालावधीमध्ये सरपंच, सरपंच पती,ग्रामसेवक व ज्यांचे नावे बोगस बिले उचलण्यात आली त्या व्यक्ती यांनी संगणमताने एकूण ३९ लाख २१ हजार २९१ रुपयाचा शासकीय निधीचा अपहार केलेला असूनरोगापेक्षा इलाज भयंकर अशी परिस्थिती झाली आहे चार आण्याची कोंबडी आणि बारा आण्याचा मसाला या म्हणी प्रमाणे निकृष्ट दर्जा चे साहित्य वापरून लाखो रुपयांची बीले एकाच एजन्सी धारका कडून घेऊन शासकिय निधीचा मोठ्या प्रमाणात,लाखो रुपयांचा अपहार करण्यात आला आहे. मौजे सोनी जवळा येथे लोकनियुक्त महिला सरपंच असून त्यांची सर्व कामे त्यांचे पती बेकायदेशीरपणे करत आहेत सरपंच पती हे ग्रामपंचायतचे सदस्य किंवा पदाधिकारी नसताना,सरपंच पती ग्रामपंचायत सदस्य उपस्थित असणाऱ्या ग्रामसभेचे अध्यक्ष पद ही सरपंच पती स्वतः कडे ठेवतात,गावातील कोणत्याही नागरिकांचे मत विचारात न घेता मनमानी करत निर्णय घेतात.असे सोनी जवळा गावच्या जनतेतून



बोलले जात आहे.

सोनी जवळा गावचा विकास म्हणजे रोगापेक्षा इलाज भयंकर

आज गावची अवस्था अशी झालेली दिसून येते,ग्रामपंचायतीच्या कोणत्याही कामाची माहिती जमाखर्चाची माहिती देत नाहीत, तसेच कोणत्याही कामाचा आराखडा नागरिकासमोर ठेवत नाहीत तसेच कोणाची संमती विचारात न घेतली जात नाही. लाभार्थी निवड सुद्धा ग्रामसभेत नागरिकांचे मत विचारात न घेता केली जाते तसेच गावच्या नागरिकांना त्यांचे प्रश्न मांडू देत नाहीत,सरपंच ग्रामसेवक व सरपंच पती हे स्वतःची मनमानी करून कोणतीही कामे न करता तसेच निकृष्ट दर्जाची कामे करून शासकीय निधीचा अपहार करत आहेत. त्यामुळे शासकीय निधीचा वापर गावातील विकास कामासाठी होत नसून लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ ही मिळत नाही तरी गट विकास अधिकारी,पंचायत समिती केज यांनी सर्व बाबी विचारात घेऊन ग्रामपंचायत सोनिजवळा अंतर्गत कागदोपत्री झालेल्या विकास कामाबाबत सखोल चौकशी करून संबंधितावर कठोर कारवाई करावी अशी गावकर्यांतून दबक्या आवाजात चर्चा सुरु आहे असे तक्रारदार गायकवाड हनुमंत सुखदेव व कोकाटे बाळासाहेब सोपान यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले.

संबधीत निवेदनाच्या प्रती मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, मा.जिल्हाधिकारी बीड,मा.पालकमंत्री बीड,मा.ग्रामविकास मंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई यांना देण्यात आले आहेत.

# जागरूक पालकत्व हाच समाजाचा आधार- श्रीमती वर्षा मुंडे

माजलगाव ।प्रतिनिधी

भा.शि. प्र संस्था संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित पालक मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्रीमती वर्षा मुंडे म्हणाल्या की, समाजातील आजची परिस्थिती बदलली आहे. स्पर्धा मोठ्या प्रमाणात आहे. शिक्षणासोबत तुमचं कौशल्य हे विद्यार्थ्यांना सक्षम बनवणार आहे म्हणून पालकांनी विद्यार्थ्यांना मेहनतीसाठी जागरूक करा.पालकांनी स्वतः जिज्ञासा वृत्ती जोपासली पाहिजे. याप्रसंगी व्यासपीठावर उदघाटक संस्थेचे केंद्रीय सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, प्राचार्य प्रो. डॉ. मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



उदघाटनपर मनोगत व्यक्त करताना संकुलाचे पालक व केंद्रीय सदस्य प्रकाश दुगड म्हणाले की, आजकाल पालक केवळ मुलांकडे चौथीपर्यंत लक्ष देतात त्यानंतर दुर्लक्ष केले जाते हे दुर्दैवी आहे म्हणून आता पुढच्या शिक्षणासाठी पालकांनी सजग होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांची लिखाण क्षमता कमी झाली आहे त्याचा सराव करून घेण्याची पालक व शिक्षक दोघांचीही जबाबदारी आहे.कार्यक्रमाचे अध्यक्ष अभय कोकड म्हणाले की, पालकांनी दिवसभरात एकदा मुला-मुलीसोबत एकत्र भोजन केले पाहिजे तर त्याच्याशी संवाद वाढेल व कौटुंबिक वातावरण चांगले राहून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढेल.सुरुवातीस मान्यवरांचा परिचय प्रास्ताविक, अहवाल वाचन उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे यांनी केले.

दुसऱ्या सत्रात शिक्षक - पालक संवादात प्राचार्य प्रो डॉ. मुकुंद देवर्षी यांनी महाविद्यालयाच्या भौतिक सुविधा, विविध उपक्रमांची माहिती विशद केली..प्राध्यापकांनी स्वतःचा परिचय व विषयातील संधी पालकांना सांगितली.यावेळी नवनाथ जाधव व प्रभाकर गवळी यांनी पालकांच्या वतीने मनोगत व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रमाचे ओघवते सूत्रसंचालन व आभार प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले.या प्रसंगी माता व पिता पालकांची बहुसंख्य उपस्थिती सभागृहात होती.

## केज तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून

# माजी उप मुख्यमंत्री स्व.अजित दादा पवारांचे विचार घराघरात पोंहचवु-रमेशराव आडसकर

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे गावोगावी कार्यकर्ते व बुथप्रमुख यांची नव्या जुन्या कार्यकर्त्यांचा समन्वय साधुन आपण काम करु.माजी उप मुख्यमंत्री स्व.अजित दादा पवार यांनी ग्रामीण भागातील प्रश्नांना प्राथमिकता देवुन शेतकरी, शेतमजूर यांच्या कल्याणासाठी ते अहोरात्र प्रयत्नशील होते.आज त्यांचे स्वप्न साकार करतांना उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवारांचे हात बळकट करावे लागतील असे प्रतिपादन राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते रमेशराव आडसकर यांनी केले.

पंचायत समिती,जिल्हा परिषद व नगर पंचायत या संस्था माणसांचे प्रश्न सोडविण्यासाठी असतात.नवीन मतदार नोंदणी गांवपातळीवर सुरु असुन त्याकडे ही लक्ष देण्याची जबाबदारी बुथ प्रमुख व कार्यकर्त्यांची आहे असेही त्यांनी सांगितले.या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण हे होते.तर व्यासपीठा वर केज विधानसभेचे अध्यक्ष बाळासाहेब शेप,राष्ट्रवादी ओबीसी सेलचे अध्यक्ष कल्याण आखाडे,नगर पंचायत च्या नगराध्यक्षा डॉ.सौ. सिताताई बनसोड, सय्यद नवाब मामु, मुजफ्फर इनामदार व सर्व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक,विविध गावातील सरपंच व चेअरमन उपस्थित होते.याप्रसंगी कल्याण आखाडे,मुजफ्फर इनामदार,बाळासाहेब शेप यांनी आपले विचार मांडले. अध्यक्षीय समारोपात राजेश्वर चव्हाण यांनी राष्ट्रवादीपक्ष गावोगावी जावुन तो पक्ष सर्वांना आपला पक्ष वाटला पाहिजे असे सांगितले. विविध शासकीय समित्यावर आपले कार्यकर्ते कसे जातील यासाठी मी प्रयत्नशील राहील असेही त्यांनी सांगितले.उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यावर झालेल्या गुंगी गुडिया या टिकेचा खरपुस समाचार घेवुन या पुढे टिका खपवुन घेणार नाही असे ही सांगितले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ऋषिकेश भैया आडसकर यांनी केले तर आभार प्रदर्शन अमर पाटील यांनी केले.केज तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवारांचे विचार घराघरात पोहचवु असे रमेशराव आडसकर यांनी यावेळी सांगितले




# सर्वाह व्हेंचर डेव्हलपमेंट प्रोग्राम २०२६ चे अंतिम निकाल जाहीर

## सर्वाह फाउंडेशन दिनानिमित्त १० संघांची अंतिम निवड

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :-

सर्वाह इन्क्युबेशन फाउंडेशन आणि श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था (एस.जी.जी.एस.आय.ई.अँड टी.), नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वाहच्या तिसऱ्या स्थापना दिनानिमित्त आयोजित सर्वाह व्हेंचर डेव्हलपमेंट प्रोग्राम (तऊ्झ) २०२६ अंतर्गत अंतिम फेरीतील स्टार्टअप संघांची घोषणा करण्यात आली. एस.जी.जी.एस.आय.ई. अँड टी. नांदेड च्या माजी विद्यार्थ्यांच्या (-श्रीपळ) सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून संस्थेमध्ये नवोपक्रम, उद्योजकता आणि स्टार्टअप संस्कृतीला चालना देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले.

या कार्यक्रमास एस.जी.जी. एस. आय.ई. अँड टी. च्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष प्रशांत पौळ तसेच बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे सदस्य व संस्थेचे माजी विद्यार्थी अमोल महामुनी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी सर्वाह इन्क्युबेशन फाउंडेशनचे अध्यक्ष व संचालकअभय देशपांडे, एस.जी.जी.एस.आय.ई. अँड टी.चे संचालक डॉ. मनेश कोकरे, इन्नोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस (खखङ) विभागाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद भालेराव, सर्वाह इन्क्युबेशन फाउंडेशनचे प्रमुख योगेश तावडे तसेच एस.जी.जी.एस. माजी विद्यार्थी संघटनेचे प्रतिनिधी दीपक बिसेन उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थी व माजी विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम, उद्योजकता आणि स्टार्टअप संस्कृतीला चालना देण्यासाठी सातत्याने सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

सर्वाह व्हेंचर डेव्हलपमेंट प्रोग्राम २०२६ ला विद्यार्थी आणि माजी विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ३६ अर्ज प्राप्त झाले. कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख), आरोग्य सेवा, कृषी, रोबोटिक्स, डीप-टेक, इलेक्ट्रिक मोबिलिटी, फिनटेक आणि एडटेक अशा विविध क्षेत्रांतील कल्पनांचे सादरीकरण करण्यात आले. तज्ज्ञांचे मार्गदर्शन, ओरिएंटेशन सत्रे, पिचिंग कार्यशाळा आणि दोन टप्प्यांतील कठोर मूल्यांकन प्रक्रियेनंतर १० स्टार्टअप संघांमधील १७ नवोपक्रमकांची अंतिम निवड करण्यात आली.

अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या नवोपक्रमकांमध्ये ओंकार पाटील, अनिरुद्ध श्रीरामन, श्रीकांत इंगोले, मयूर खोडे, संकेत साळवे, गौरव आधे, यश म्हसागर, जयनीत भिंगारदेवे, अभय गाडे, जान्हवी रुद्रवार, उर्जित भावसार, धीरज वासू, शर्वरी वंजारी, यशराज काकडे, आदित्य निकम, यश राऊत आणि अथर्व पाटकी यांचा समावेश आहे.



निवड झालेल्या संघांचा यावेळी प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. हे सर्व संघ आता सर्वाह इन्क्युबेशन फाउंडेशनच्या सहा महिन्यांच्या व्हेंचर डेव्हलपमेंट व इनोव्हेशन कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या कालावधीत त्यांना एक-ते-एक मार्गदर्शन (चशर्पींीहळी), बिझनेस मॉडेल व्हॅलिडेशन, ग्राहक पडताळणी (उीीांशी ऊळीलेींशिू), प्रोटोटाइप व एमव्हीपी (चतझ) विकासासाठी मार्गदर्शन, बौद्धिक संपदा (खझ) सहाय्य, उद्योग तज्ज्ञांचे मार्गदर्शन, नेटवर्किंग आणि इन्क्युबेशन सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

याशिवाय प्रत्येक निवड झालेल्या संघाला प्रोटोटाइप विकसित करण्यासाठी ५०,००० पर्यंत आर्थिक सहाय्य (निश्चित टप्पे व मूल्यमापनाच्या अधीन) देण्यात येणार आहे. तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्टार्टअप्सना शासकीय अनुदान योजना, एंजल गुंतवणूकदार, संस्थात्मक निधी संस्था तसेच पुढील गुंतवणुकीच्या संधींशी जोडले जाणार असून त्यांच्या व्यवसायवृद्धीसाठी आवश्यक सहकार्य केले जाणार आहे.यावेळी बोलताना संस्थेचे संचालक डॉ. मानेश कोकरे यांनी शैक्षणिक संस्थांमध्ये उद्योजकतेची मानसिकता विकसित करण्याची गरज अधोरेखित करत सर्वाहच्या उपक्रमाचे कौतुक केले. योगेश तावडे यांनी सर्वाह इन्क्युबेशन फाउंडेशनचा आतापर्यंतचा प्रवास, व्हेंचर डेव्हलपमेंट प्रोग्रामची वैशिष्ट्ये आणि पुढील सहा महिन्यांचा रोडमॅप सादर केला. अभय देशपांडे यांनी एसजीजीएस आयईअँडटी मध्ये जागतिक दर्जाची नवोपक्रम आणि उद्योजकता परिसंस्था उभारण्याचा सर्वाहचा संकल्प व्यक्त केला. तर दीपक बिसेन यांनी एसजीजीएस माजी विद्यार्थ्यांच्या वतीने विद्यार्थ्यांना आणि नवउद्योजकांना सातत्याने पाठबळ देण्याची ग्वाही दिली.

कार्यक्रमाची सांगता अंतिम निकाल जाहीर करणे, प्रमाणपत्र वितरण आणि स्टार्टअप आयडिया शोकेस यांसह झाली. यावेळी निवड झालेल्या संघांनी बोर्ड ऑफ गव्हर्नर्स,माजी विद्यार्थी, प्राध्यापक, उद्योग तज्ज्ञ आणि स्टार्टअप परिसंस्थेतील मान्यवरांशी संवाद साधला. या उपक्रमामुळे सर्वाह इन्क्युबेशन फाउंडेशन हे नाविन्यपूर्ण कल्पनांना यशस्वी स्टार्टअपमध्ये रूपांतरित करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले असून एसजीजीएसआयईअँडटी, नांदेड हे नवोपक्रम आणि उद्योजकतेचे सक्षम केंद्र म्हणून अधिक बळकट होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.



अर्धापूर (प्रतिनिधी)

**भोकर कडे जाणाऱ्या साईबाबा मंदिर भोकर फाटा येथे मोटारसायकल समोर कुत्रा आल्याने अपघात होऊन मोटरसायकल वरील मुकुंद परळीकर यांचा हात फ्रॅक्चर होऊन पायास दुखापत झाली तर दीपक चिंकेवार राहणार दोघेही लोहा यांच्या हातापायास डोक्याला मार लागून ते जखमी झाले आहेत. या अपघाताची माहिती मिळताच श्रीमदजगदगुरु रामानंदाचार्य श्रीनरेंद्रचार्य संस्थांच्या रुग्णवाहिकेचे चालक राजू पाचंगे यांनी सामाजिक कार्यकर्त्याच्या मदतीने जखमींना नांदेड येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे असल्याची माहिती दिली**

# नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने प्राधिकृत अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या कार्यकाळात साधली उल्लेखनीय प्रगती

नांदेड । प्रतिनिधी

ऑगस्ट : प्राधिकृत अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली दि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रशासनात पारदर्शकता, आर्थिक शिस्त आणि थकीत कर्जवसुलीला प्राधान्य देत बँकेच्या हिताचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय प्रभावीपणे राबविण्यात आले असून त्याचे सकारात्मक परिणाम बँकेच्या कामकाजावर दिसून येत आहेत.

दि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची मुदत ३ एप्रिल २०२६ रोजी संपुष्टात आल्याने विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांनी २७ एप्रिल २०२६ रोजी संचालक मंडळ निष्प्रभावित करून बँकेचा दैनंदिन कारभार पाहण्यासाठी नांदेडचे सहकारी संस्था जिल्हा उपनिबंधक शाहुराज हिरे यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर अपर निबंधक तथा सहसचिव सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग मुंबई यांच्या निर्देशानुसार विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांनी २० मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली. त्यांनी २२ मे २०२६ रोजी पदभार स्वीकारल्यानंतर बँकेच्या कामकाजात गती आणत विविध महत्त्वपूर्ण निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी केली.

प्राधिकृत अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या कार्यकाळातील उल्लेखनीय कामगिरी जून व जुलै २०२६ या दोन महिन्यांत बँकेच्या मासिक बैठका नियमित घेण्यात आल्या. या बैठकींमध्ये एकूण ७० ठरावांना मंजुरी देऊन बँकेच्या कामकाजाला गती देण्यात आली.

जिल्हा परिषद संबंधित पगारदार सहकारी पतसंस्थांच्या थांबलेल्या थकीत कर्जवसुलीचा प्रश्न प्राधान्याने हाताळण्यात आला. ज्यामध्ये बँकेचे व पगारदार पतसंस्थेचे सभासदाकडून सुमारे १५ कोटी इतकी थकबाकी असलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी संबंधितांना निर्देश देण्यात आले. तसेच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांच्याशी पत्रव्यवहार व चर्चा करून कर्जवसुलीची प्रक्रिया नियमित सुरू केली.

कलंबर विभाग सहकारी साखर कारखान्याकडे असलेल्या बँकेच्या थकीत कर्जाच्या वसुलीसाठी कारखान्याच्या मालमत्तेवर बँकेचा बोजा नोंदविण्याची कार्यवाही करण्यात आली. मा. दिवाणी न्यायालयाच्या आदेशानुसार सातबारा उताऱ्यावर बँकेचा बोजा नोंदविण्यात आल्यामुळे अनुत्पादित १० कोटी रुपये कर्जाच्या वसुलीचा मार्ग मोकळा झाला.

बँकेचे आर्थिक नुकसान करणाऱ्या प्रकरणांवर कठोर भूमिका घेत अपहार, अफरातफर व नियमबाह्य कर्जवाटपात दोषी आढळलेल्या तीन कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करण्यात आले. तसेच कासराळी शाखेतील अपहार प्रकरणात दोन कर्मचाऱ्यांना निलंबित करून त्यांच्याविरुद्ध बिलोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईद्वारे बँकेच्या हिताला बाधा आणणाऱ्या कोणत्याही गैरप्रकारास माफी दिली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश देण्यात आला.

## किनवट शहरात अवैध रेती वाहतुकीवर बंदीची मागणी

किनवट । प्रतिनिधी

किनवट शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ व गल्लीबोळातून गाढव-खेचरांच्या माध्यमातून सुरू असलेल्या अवैध रेती वाहतुकीमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शहरप्रमुख तथा स्वीकृत नगरसेवक प्रशांत कोरडे यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन दिले. अवैध रेती वाहतुकीवर तात्काळ कायमस्वरूपी बंदी घालावी, अन्यथा शिवसेना स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनावर माजी शहरप्रमुख संतोष येलचलवार व शहर संघटक किशोर बोलेनवार यांच्या स्वाक्षऱ्या असून, त्याच्या प्रती जिल्हाधिकारी, तहसीलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षक यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.



# रोटरी क्लबचे हरित बीडसाठी आणखी एक पाऊल; ३५० देशी वृक्षांचे रोपण

## महाजनवाडी, म्हाळस जवळा, मांजरसुंबा व नाथापूर येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

बीड / प्रतिनिधी

पर्यावरण संवर्धन आणि विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेमाची भावना दृढ करण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ बीडतर्फे 'प्रोजेक्ट - वृक्षारोपण व संगोपन' हा उपक्रम 'एक पेड माँ के नाम' या संकल्पनेअंतर्गत जिल्ह्यातील विविध जिल्हा परिषद शाळांमध्ये राबविण्यात आला. या अभियानात महाजनवाडी, म्हाळस जवळा, मांजरसुंबा आणि नाथापूर येथील शाळांमध्ये एकूण ३५० देशी वृक्षांची लागवड करून हरित बीडसाठी आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.

या उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ आणि रोटरी सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश दिला. प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या आईच्या नावाने एक झाड दत्तक घेण्यास प्रोत्साहित करण्यात आले. प्रत्येक रोपाला संबंधित विद्यार्थ्याच्या आईच्या नावाचा टॅग लावून त्या झाडाच्या संगोपनाची जबाबदारी विद्यार्थ्यांकडे सोपविण्यात आली.

वृक्षांचे पर्यावरणीय, सामाजिक आणि आरोग्यदृष्ट्या असलेले महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. त्याचबरोबर वृक्षसंवर्धनाची सामूहिक शपथ देऊन झाडांचे संरक्षण करण्याचा संकल्प करण्यात आला. शाळा प्रशासनाने लावलेल्या वृक्षांच्या नियमित संगोपनाची जबाबदारी स्वीकारत त्याबाबत वेळोवेळी प्रगती अहवाल देण्याचे आश्वासन दिले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने संबंधित गावांमध्ये जनजागृती करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. दुर्गम भागातील जिल्हा परिषद शाळांची निवड, स्थानिक नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि वृक्षलागवडीसोबत संगोपनावर दिलेला विशेष भर ही या प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये ठरली.

उपक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणी अध्यक्ष सीए गोपाल लड्डा, सचिव सुहास बेदरे, प्रकल्प प्रमुख प्रा. अभय पटवारी आणि विवेक बडगे यांनी केली. विकास उमापूरकर व प्रमोद करमाळकर यांनी समन्वय, प्रत्यक्ष वृक्षारोपण आणि व्यवस्थापनात योगदान देत उपक्रम यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.




उपक्रमाच्या माध्यमातून 'झाड लावा, झाड जगवा' हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करून हरित बीडच्या संकल्पनेला बळकटी देणारे हे अभियान ठरल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

'एक पेड माँ के नाम' संकल्पना

प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईच्या नावाने एक झाड दत्तक घेत त्याच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारली. प्रत्येक रोपावर आईच्या नावाचा टॅग लावून झाडाशी भावनिक नाते जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबरोबरच कुटुंबीयांप्रती जिव्हाळ्याची भावना अधिक दृढ झाली.

उपक्रमाची वैशिष्ट्ये

महाजनवाडी, म्हाळस जवळा, मांजरसुंबा आणि नाथापूर येथील दुर्गम जिल्हा परिषद शाळांमध्ये ३५० देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपणासोबत त्यांच्या नियमित संगोपनावर विशेष भर देत शाळांनी जबाबदारी स्वीकारली. विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ आणि रोटरी सदस्यांच्या सहभागामुळे पर्यावरण संवर्धनाचा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचला.

## माहिती लपवणाऱ्या मावसाळा ग्रामपंचायतीला राज्य माहिती आयोगाचा दणका

खुलताबाद/ प्रतिनिधी

माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविलेली माहिती न देता टाळाटाळ करणाऱ्या मावसाळा ग्रामपंचायत ता. खुलताबाद प्रशासनाला राज्य माहिती आयोगाने कडक आदेश देत चांगलाच दणका दिला आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते विरेंद्र वाघ यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर सुनावणी करत आयोगाने संबंधित अधिकाऱ्यांना ३० दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले असून, माहिती उपलब्ध न झाल्यास अभिलेख गहाळ करणाऱ्या जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अंतर्गत थेट पोलीस ठाण्यात गुन्हा (ऋखठ) दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

माहिती अधिकार कायद्यानुसार मागविलेल्या माहितीला ग्रामपंचायतीकडून अभिलेखात उपलब्ध नाही असे उत्तर देण्यात आले होते. त्यानंतर प्रथम अपील करूनही माहिती न देता प्रकरण प्रलंबित ठेवण्यात आले. अखेर विरेंद्र वाघ यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सुनावणीदरम्यान आयोगाने संबंधित प्रकरणाची गंभीर दखल घेत हा आदेश दिला.

आयोगाने पंचायत समिती खुलताबादच्या गटविकास अधिकाऱ्यांना ३० दिवसांच्या आत संबंधित माहिती शोधून अर्जदारास विनामूल्य उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, माहिती उपलब्ध झाली नाही तर अभिलेख गहाळ करण्यास जबाबदार असलेल्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांविरुद्ध थेट ऋखठ दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आदेशाची अंमलबजावणी न झाल्यास त्याची जबाबदारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर राहणार असल्याचेही आयोगाने स्पष्ट केले आहे.